## जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्रं. - १८** **// महासभा बैठकीचे कार्यवृत्त //** **दि.११/०२/२०२०**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि. ११/०२/२०२० मंगळवार रोजी सकाळी ११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर सौ. सोनवणे भारती कैलास यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करून खालील मा.सभासद सभेस उपस्थित होते.

**मा.सौ.सोनवणे भारती कैलास, महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| जोहरे प्रिया मधुकर | भोईटे लताबाई रणजीत | पाटील राजेंद्र झिपरु |
| नेरकर सरिता अनंत | पाटील प्रतिभा सुधिर | महाजन सुनिल सुपडू |
| पोकळे दिलीप बबनराव | पाटील चंद्रशेखर शिवाजी | शेख शबानाबी सादीक |
| सोनवणे कांचन विकास | कापसे मयुर चंद्रकांत | नाईक प्रशांत सुरेश |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | कापसे प्रतिभा चंद्रकांत | काळे रेश्मा कुंदन |
| शिंदे गायत्री उत्तम | देशमुख प्रतिभा गजानन | आहुजा मनोज नारायणदास |
| बविस्कर किशोर रमेश | पाटील विजय पुडलिक | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| सपकाळे मिना धुडकु | सोनवणे सुरेश माणिक | सोनार रंजना विजय |
| कोळी दत्तात्रय देवराम | बारी शोभा दिनकर | खडके सुनिल वामनराव |
| सपकाळे रंजना भरत | शेख हसीनाबी शरीफ | खडके विश्वनाथ सुरेश |
| सनकत चेतन गणेश | पाटील कुलभुषण विरभान | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| चौधरी चेतना किशोर | भिल पार्वताबाई दामु | देशमुख सुन्नाबी राजु |
| भंगाळे विष्णू रामदास | पाटील उषा संतोष | शेख सैईदा युसुफ |
| तायडे ज्योती शरद | कोल्हे सिंधु विजय | पटेल इब्राहिम मुसा |
| लढढा नितीन बालमुकुंद | बरडे नितीन मनोहर | सोनवणे निता मंगलसिंग |
| काळे अमित पांडुरंग | बेंडाळे उज्वला मोहन | सोनवणे विक्रम किसन |
| चौधरी मंगला संजय | राणे गायत्री इंद्रजित | **स्विकृत सदस्य** |
| ॲड . हाडा शुचिता अतुलसिंह | जोशी अनंत हरिश्चंद्र | सोनवणे कैलास नारायण |
| सोनवणे धीरज मुरलीधर | तायडे सुरेखा नितीन | त्रिपाठी विशाल राधेशाम |
| भोळे सिमा सुरेश | चव्हाण ज्योती बाळासाहेब | मराठे राजेंद्र नारायण |
| काळे दिपमाला मनोज | मराठे जितेंद्र भगवान | चौधरी महेश रतन |
| पाटील सचिन भिमराव | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर | जैन भागचंद मोतीलाल |
| चौधरी मनोज सुरेश | ढेकळे सदाशिव गणपत | |

सदर सभेस मा.उपायुक्त.श्री.अजित मुठे, मा.उपायुक्त.श्री.मिनीनाथ दंडवते, मुख्यलेखापरिक्षक, श्री.संतोष वाहुळे, मुख्यलेखाधिकारी, श्री.कपील पवार, सहा.आयुक्त श्री.पवन प्रकाश पाटील, नगररचनाकार श्री.सु.आ.पवार, शहर अभियंता श्री.सुनिल भोळे व नगरसचिव श्री.सुनिल गोराणे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते .

**सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले.**

**सभेच्या सुरूवातीस वंदेमातरम ने सुरूवात करण्यात आली.**

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता सन्मा .सदस्या सौ.भापसे जिजाबाई आणासाहेब व सन्मा. सदस्य श्री.सानवणे अश्विन शांताराम, श्री.कोल्हे प्रविण रामदास, श्री. सोनवणे मुकुंदा भागवत, श्री.कोल्हे ललित विजय, श्री.बालाणी भगतराम रावलमल यांचे रजेचे अर्ज आलेले असुन ते मा. पिठासिन अधिकारी यांनी मंजूर केलेले आहेत.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.२४२ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे श्रध्दाजंलीचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | श्रध्दांजलीचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | १) सोनवणे भारती कैलास, मा.महापौर<br>२) भोळे सिमा सुरेश | १) शहरातील प्रतिष्ठीत वैदय श्री.ओमप्रकाशजी त्रिपाठी यांच्या धर्मपत्नी तसेच सन्मा.सदस्य श्री.विशाल त्रिपाठी यांच्या मोठया काकु स्व.सुमित्राबाई ओमप्रकाश त्रिपाठी, २) सुवर्ण व्यापारी श्री.संजय शर्मा, ३) जळगांव शहराचे माजी उपनगराध्यक्ष श्री.प्रकाशदादा पाटील यांच्या पत्नी माजी नगराध्यक्ष स्व.पुष्पाताई प्रकाश पाटील यांचे दु:खद निधनाबाद्दल. |
| २. | १) कोल्हे सिंधू विजय<br>२) बाविस्कर किशोर रमेश<br>३) प्रा.पाटील सचिन भिमराव<br>४) सनकत चेतन गणेश<br>५) आहुजा मनोज नारायणदास<br>६) नाईक प्रशांत सुरेश<br>७) बेंडाळे उज्वला मोहन | जळगांव शहराचे माजी उपनगराध्यक्ष श्री.प्रकाशदादा पाटील यांच्या पत्नी माजी नगराध्यक्ष स्व.पुष्पाताई प्रकाश पाटील यांचे दु:खद निधनाबाद्दल. |
| ३. | १) बाविस्कर किशोर रमेश<br>२) प्रा.पाटील सचिन भिमराव | हिंगनघाट येथे पेट्रोल ओतुन पेटवण्यात आलेली स्व.प्राध्यापिका अंकिता पिसुड्डे यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ४. | १) सनकत चेतन गणेश<br>२) नाईक प्रशांत सुरेश | दलितमित्र तथा माजी नगरसेवक कै.अरुण शिवप्रकाश चांगरे यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ५. | भंगाळे विष्णू रामदास | १) जळगांव शहराचे माजी उपनगराध्यक्ष श्री.प्रकाशदादा पाटील यांच्या पत्नी माजी नगराध्यक्ष स्व.पुष्पाताई प्रकाश पाटील, २) श्री.भावेश कामानी यांच्या आई स्व.सौ.निर्मला कामानी, ३) गणेश कॉलनीतील प्रा.वृषाली कोल्हे यांचे पती गांधी हायस्कुलचे विदयमान उपाध्यक्ष स्व.विलास रामू कोल्हे, ४) असोदा येथिल श्री.प्रदिप भोळे यांचे वडील स्व.पंढरीनाथ भोळे, ५) साकोरा ता.नांदगांव येथिल रहिवासी तथा देशदूतचे महाव्यवस्थापक श्री.विलास जैन यांच्या भगीनी स्व.मीना रमेश पाटणी, ६) गुजराथी गल्ली येथिल श्री.परेश कोठारींचे काका व श्री.रजनिकांत कोठारी यांचे आतेभाऊ स्व.रसिक दलिचंद कोठारी, ७) दावलभक्त हॉस्पीटल जवळील श्री.शामसुंदर झंवर यांचे लहान बंधू व राकेश व रुपेश झंवर यांचे वडील तसेच श्री.मनिष झंवर यांचे काका स्व.शरदचंद्र काशिनाथ झंवर, ८) वरखेडी बु ता.चाळीसगांव येथील स्व.आण्णासाहेब सहकार महर्षी उदेयसिंग रामसिंग पवार, ९) गुजराथी समाजाचे अध्यक्ष श्री.राजेश दोशी यांचे बंधू स्व.तुषार अनंतराव दोशी, १०) हरीविठ्ठल नगर येथिल माजी नगरसेविका विमलताई हटकर यांचे पती व कैलास व आण्णा हटकर यांचे वडील स्व.माजी नगरसेवक बुधा दला हटकर, ११) ढेकू खु ता.अमळनेर येथील सेवानिवृत्त डी.वाय.एस.पी.श्री.अरविंद पाटील व डॉ.श्री.किरण पाटील यांचे वडील स्व.माजी आमदार अमृतराव वामनराव पाटील यांचे दु:खद निधनाबाद्दल. |
| ६. | बेडाळे उज्वला मोहन | स्व.प्रा.वसंत हरी जावळे यांचे दु:खद निधनाबद्दल. |

**श्री.नितीन लढढा :-** स्व.पुष्पाताई प्रकाश पाटील यांनी अनेक वर्ष तत्कालीन नगरपालिका आणि महानगरपालिका याच्यामध्ये बराच वेळ दिलला होता. पुष्पाताई, ज्या ज्या वेळी नविन नगरसेविका निवडुन यायच्या, त्या नविन नगरसेविकांना मार्गदर्शन करण्याच्या दृष्टीकोणातुन त्यांची एक मोठी भुमिका असायची. कारण त्या जेष्ठ होत्या आणि सगळयांना मिळुन मिसळुन वागवुन घेत होत्या. अस पुष्पाताईंच अत्यंत कमी वयात ६१ वर्ष वय होत त्यांच. आणि काल आजारपणामुळे सकाळी त्यांच दुखद निधन झाल. मी जळगांव शहर शिवसेनेतर्फे आणि सभागृहातर्फे त्यांना विनम्र आदरांजली वाहतो की, त्यांच्यामुळे या सभागृहात आज जरी त्या नसल्यात तरी ही त्यांच्या कृती या सभागृहात राहतील अशी मी अपेक्षा करतो. ईश्वर त्यांच्या आत्म्याला शांती प्रदान करो हीच प्रभुचरणी प्रार्थना करतो.

ॲड.सौ.शुचिता हाडा :- आदरणीय नितीन भाऊंनी पुष्पाताई पाटील यांच्या बद्दल भावना व्यक्त केलेल्या आहे. मला वाटत सर्व सभागृहाला आणि जे जे येथे जुने सदस्य आहे. जे नविन सदस्य असतील त्यांना पुष्पाताई बद्दल काही फारशी माहिती नसेल. पण सभागृहात ते जेष्ठ सदस्या होत्या.नगरपालिका असतांना सुध्दा त्यांनी कामकाज बघितलेल आहे. महानगरपालिका झाल्यानंतर ही त्यांचा सभागृहात सक्रिय सहभाग होता. एक अतिशय चांगल व्यक्तीमत्व आपल्यातुन हरपलेल आहे. त्यांना शांती लाभो अशी मी प्रार्थना करते आणि त्यांना श्रध्दांजली अर्पण करते.

श्रध्दांजली बाबत आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त दु:खद घटनेबाबत सभागृहाला अत्यंत दु:ख होत आहे. परमेश्वर इहलोक सोडून गेलेल्या मृतात्म्यास चिरशांती प्रदान करो, त्यांच्या समस्त कुटूंबियांचे दु:खात सभागृह सहभागी असून त्यांचे कुटूंबियांना, मित्र परिवारास दु:ख सहन करण्याची शक्ती प्रदान करो या भावनेसह सभागृहाने दोन मिनीटे शांत उभे राहून दिवगंत आत्म्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २४३ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे अभिनंदनाचे प्रस्ताव मांडले.

| **अ.क्र.** | **सन्मा.सदस्यांचे नांव** | **अभिनंदनाचे प्रस्ताव** |
|---|---|---|
| १ | १) सोनवणे भारती कैलास मा.महापौर<br>२) भोळे सिमा सुरेश | मनपा कर्मचारी श्री.राजेश विंचवेकर यांची कन्या कु.प्राजक्ता राजेश विंचवेकर सी.ए.परिक्षा उत्तीर्ण झालेबद्दल २) मनपा कर्मचारी श्री.पांडुरंग जामसिंग पाटील यांची कन्या कु.सोनाली पांडुरंग पाटील गुप्तवार्ता अधिकारी पदी नेमणुक झालेबद्दल ३) मनपा कर्मचारी श्री.बाळासाहेब चव्हाण यांची कन्या कु.राजश्री बाळासाहेब चव्हाण बी.ई.सिव्हील परिक्षा प्रथम श्रेणीने उत्तीर्ण झालेबद्दल. |
| २ | १) बाविस्कर किशोर रमेश<br>२) वानखेडे रंजना विजय<br>३) आहुजा मनोज नारायणदास<br>४) सनकत चेतन गणेश<br>५) नाईक प्रशांत सुरेश<br>६) भंगाळे विष्णू रामदास<br>७) सिंधू विजय कोल्हे | सौ.भारतीताई कैलास सोनवणे यांची जळगांव शहर महानगरपालिकेच्या महापौर पदी निवड झालेबद्दल. |
| ३ | वानखेडे रंजना विजय | वार्ड क्रं.१९ अ च्या पोटनिवडणुकीत नगरसेवकपदी सौ.निताताई सोनवणे यांची बिनविरोध निवड झालेबद्दल. |
| ४ | भंगाळे विष्णू रामदास | मा.ना.श्री.गुलाबरावजी पाटील सो. यांची जळगांव जिल्हा पालकमंत्री पदी निवड झालेबद्दल. |

**श्री.कैलास सोनवणे :-** येथे महापौर आहे. घरी वेगळ नात आहे. आणि तेव्हाच सांगुन दिलेल आहे आगोदर नितीनभाऊ, बंटी भाऊ, ईबा भाई, प्रशांत इकडील विशाल, ढेकळे साहेब, शुचितताई यांनी परवानगी मागीतली की लगेच द्यायची जनरली जे बोलणारे आहे आणि जे नाही बोलणारे आहे त्यांनी मागीतली तर त्यांना आधी द्यायची. अभिनंदनाच्या ठरावाबाबत बोलत आहे महापौर साहेब प्राजक्ता विंचवेकर, सोनाली पाटील आणि राजश्री चव्हाण तिघही एकापेक्षा एक सरस एक सी.ए. झालेली आहे, एक गुप्तवार्ता अधिकारी झालेली आहे. आणि एक ज्योतीताईंची मुलगी पुर्ण कॉलेज मध्ये एक नंबरने पास झालेली आहे. तिघही मुली खुप चांगल वाटत ज्या वेळेला आपले कर्मचाऱ्यांचे मुल, मी माहिती घेतली तर २५-३० हजारापेक्षा जास्त पगार तिघांचा ही नाही. आणि ३० हजार रुपयांमध्ये कुटुंब सांभाळण, मुलांना शिकवण आणि ते ही इतके मेरिट मध्ये ते येणं. आमच हे भाग्य आहे, म्हणजे आमच्या घरात ही खुशी आलेली आहे. आज जे इतक चांगल प्राविण्य मिळविल तिघी मुलींनी आनंद वाटतो आपल्या कुटुंबाचा हे एक भाग आहे. मी या ठिकाणी त्यांच अभिनंदन करतो.

**श्री.नितीन लढढा :-** कैलास आप्पांनी जे काही सुचना दिल्या असतील, त्या सुचना घरीच ठेवुन द्या आणि सभागृहाच्या सुचनांकडे लक्ष द्या. आज आपली पहिली सभा आहे म्हणुन आपल अभिनंदन. पहिल्या सभेला आपण १५.०० मिनट उशिरा आलात. कदाचित नविन असल्या कारणाने एखाद्यावेळेस विलंब झाला असेल आपल्याला.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही, कोरम नव्हता, ते तर १०.०० वाजेपासुन आलेले आहेत.

**श्री.नितीन लढढा :-** मा.महापौरताई, निश्चितपणे आपला अनुभव या सभागृहात चांगला आहे, पिठासीन अधिकारी म्हणुन आपण उपमहापौर पद सुध्दा भुषवलेले आहे. त्यामुळे प्रशासकीय कामा संदर्भात काही अनुभव ही आपणास मिळालेला आहे. आमची या सभागृहातर्फे आणि शिवसेना सदस्यांतर्फे ऐवढीच विनंती राहिल की, कुठल्यातरी सकारात्मक विषयावरती जर विरोधीपक्षातुन काही सुचना येत असतील. तर निश्चितपणे त्याच्यावरती सादकबादक चर्चा करण्याच्या अनुषंगाने आपण आम्हाला संधी द्याल अशी अपेक्षा करतो. निव्वळ कुठेतरी विरोधात म्हणुन चांगल्या विषयाला सुध्दा विरोध करणे ही आमची संस्कृती नाही आणि तस आम्ही वागणार नाही. या बाबत आम्ही तुम्हाला आश्वासन देतो. या सभागृहाची जी सभ्यता आहे ती पाहण्याच्या संदर्भात निदर्शनात घ्यालच अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि आपला जो काही कार्यकाळ राहील तो निश्चितपणे उपयुक्त राहील अशी अपेक्षा व्यक्त करतो, पुनश: आपल्याला शुभेच्छा देतो धन्यवाद.

**श्री.अनंत जोशी :-** महापौर साहेबा, सर्व प्रथम शिवसेनेच्या वतीने आणि सभागृहाच्या वतीने कर्मचारी आणि पदाधिकाऱ्यांच्या वतीने आपली पहिली महासभेत स्वागत करतो. नितीन भाऊंनी शिवसेनेतर्फे अभिनंदनाचा विषय मांडलेला आहे. माझ बोलण गरजेच होत कारण माझ्या लहानपणाच्या काही भावना या दिवसाशी जुडलेल्या आहे. ठळकपणे या विषयावर बोलतो आप्पांशी मी बोलेलो आहे या विषयावर. आम्ही शाळेत असतांना किंवा कॉलेजला असतांना म्हणा, आप्पा हे हाडाचे कार्यकर्तो आहे ज्यांनी वाहुन घेतलेल आहे स्वत:ला, पक्ष संघटना म्हणुन शहरात काम करतांना किंवा शहर वासीयांसाठी काम करतांना. या २५-३० वर्षापासुन माझ्या सारख्या अनेक मुलांच हे स्वप्न होत आणि त्याला खरंखर तर विलंब झाला. आप्पांनी कधीचच व्हायल होत किंवा आपण व्हायला पाहिजे होत. शहरातील अनेक लोकांची ईच्छा होती की, त्यांना या खुर्चीवर बघाव पण तुमच्या निमित्ताने महापौर आज विराजमान झालेले आहात, पण आमच स्वप्न काही अंशी पुर्ण झालेल आहे. आप्पांच्या घरात हे पद गेलेल आहे म्हणुन मला विशेष आनंद आहे आणि आमच्या सारख्या किती लोकांना आनंद आहे. आपणास पुन्हा अभिनंदन करतो आणि बोलायची संधी दिली म्हणुन धन्यवाद.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** सर्व प्रथम मा.महापौर यांच अभिनंदन व एक सुचना करतो, काल आपले सभागृहातील पुष्पाताई माजी नगराध्यक्ष यांच दुखदनिधन झाले, परंतु तेथे रात्री १०.३० वाजले होते आणि दशक्रिया करतांना लोकांना मोबाईल टॉर्च लावावी लागली. सुनिल भाऊ तुम्ही पण होतात. तेथे एकच लाईट आहे मोठा आणि जेथे प्रेत दहन करतात ते खाली आहे. तेथे उजेळ पडत नाही. तर दक्षिणेकडुन आणि उत्तरेकडुन दोन फोकस लावावे की, अशी अडचण भासणार नाही. लोकांना टॉर्च वापरावी लागणार नाही. दशक्रिया ही कधीही होते रात्री बेरात्रीही होते. तर तेथे लाईटची व्यवस्था करण्यात यावी.

**श्री.अनंत जोशी :-** आमचे शिवसेनेचे नविन नगरसेविका सोनवणेताई सुध्दा या ठिकाणी उपस्थित आहे त्यांची देखील पहिली सभा आहे, मी ताईच ही या ठिकाणी अभिनंदन करतो.

**मा.महापौर :-** आपले सर्वांचे सहकार्य मिळेल अशी अपेक्षा करते आणि तुम्ही जे बोलले इबा भाऊ लाईटांच ते ही करते.

**नगरसचिव :-** सहा.संचालक, नगररचना विभाग श्री.सु.आ.पवार हे नुकतेच रुजु झालेले आहे कृपया त्यांनी त्यांचा परिचय द्यावा ही विनंती.

**सहा.संचालक, श्री.सु.आ.पवार :-** सन्मा.सदस्य व सभागृह मी श्री.सु.आ.पवार आता नुकतेच सहा.संचालक या पदावर रुजु झालेलो आहे.

**नगरसचिव :-** सहाय्यक आयुक्त श्री.पवन प्रकाश पाटील हे सुध्दा रुजु झालेले आहे त्यांनी त्यांचा परिचय सभागृहाला द्यावा ही विनंती.

**सहा.आयुक्त श्री.पवन पाटील :-** मी पवन प्रकाश पाटील आज पासुन सहा.आयुक्त म्हणुन रुजु होत आहे.

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने वरील सर्व पदाधिकारी, सन्मा.नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते व सामाजिक संस्था यांचे हे सभागृह अभिनंदन करीत असुन उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत आहे.

**नगरसचिव :- विषय क्रं:- १)** दिनांक १९/१२/२०१९ रोजी संपन्न झालेल्या महासभेचे कार्यवृत्त कायम करणे.
**श्री.धिरज सोनवणे :-** विषय मान्य आहे.
**श्री.राजेंद्र पाटील :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.२४४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, दि.१९/१२/२०१९ रोजी झालेल्या महासभा बैठकीचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६३ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- सोनवणे धिरज मुरलीधर**
**अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २)** नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.१३ मध्ये एकुण १४ विविध कामे करणे कामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.५,२७,४५,३०८/- मात्र खर्चाचे प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**सौ.सुरेखा तायडे :-** विषय मान्य आहे.
**श्री.कुलभुषण पाटील :-** माझे अनुमोदन आहे.
**श्री.नितीन लढढा :-** सर्व विषयांवर बोलण्या सारखे काही नाही.
**श्री.कैलास सोनवणे :-** फक्त भुसंपादनाच्या विषयावर हाडाताई बोलतील.
**श्री.नितीन लढढा :-** भुसंपादनाच्या विषयावर ताईंनी बोलाव बाकी सर्व विषय मान्य करणेस हरकत नाही. भुसंपादनावर चर्चा करणे पुर्वी ताई. मागच्या आठवडयामध्ये ज्या घडामोडीच्या बातम्या वृतपत्रातुन वाचल्या. आज सभामध्ये आयुक्त उपस्थित नाही. आणि आयुक्त उपस्थित नसतांना त्या जे सर्व वृतपत्रातल्या बातम्यांचा जो सार होता. तो कुठेतरी प्रशासनाच्या अवतीभवती फिरतांना दिसुन येत होता. आणि अश्या विषयांवर चर्चा करतांना प्रशासनाचा जबाबदारीचा बळ असलेले आयुक्त साहेब आज येथे उपस्थित नसल्या कारणाने काय होत की आपण मोठे बळ नसले तरी चर्चा करणार त्याच्यावरती. आणि चर्चा व्हायला ही पाहिजे त्याच्यावरती, कारण विषय तसा बघितला तर गंभिर आहे. साधारणता दोन तिन वर्षापासुन चालत आलेला हा विषय आहे. आणि ज्या काही घडामोडी वृतपत्रातुन वाचल्या त्याच गांभिर्य पाहता चर्चा करणे अपेक्षित आहे परतु चर्चा करणार कोणाशी. हा विषय वारंवार प्रशासनासमोर येतो. ज्या वेळेला सर्व उच्च पद धारण केलेली व्यक्ती की ज्यांच्याकडुन चर्चा अंती काही निर्णय अपेक्षित असतो. आज मुठे साहेबांकडे त्यांच्या अनुउपस्थितीत चार्ज असेल किंवा ते आज त्यांच्या ठिकाणी बसले असतील. परंतु आपल्या झालेल्या चर्चेला पुन्हा आपणास हेच उत्तर मिळेल. की मी या संदर्भात आयुक्तांशी चर्चा करुन काय होईल योग्य ते निर्णय कळवतो. म्हणजे काय होत ती चर्चा जी असते ती निरर्थक ठरते. आपण जरुर चर्चा करावी परंतु काय होत. कारण महासभा महिन्यातुन एकदा होते, महासभा आपण स्थायी समिती सभा प्रमाणे दर आठवड्याला घेत नसतो. महिन्या दोन महिन्यातुन एक महासभा होते. आणि खुप गांभिर्यपुर्वक विषय सभासद या सभागृहात मांडत असतांना आयुक्त जर अनुउपस्थीत राहत असतील तर मला वाटत की, निश्चितपणे खेदाची बाब आहे. तर या अनुषंगाने आपण महापौरताई त्यांना सुचना करायला पाहिजे. मा.जिल्हाधिकारींकडे प्रभारी पद आहे हे ही आम्हाला मान्य आहे त्यांच्याकडे पदभार मोठा आहे संपुर्ण जिल्ह्याचा व्याप आहे. परंतु हे सभागृह सुध्दा कुठेतरी शहरातल्या ५ लाख लोकांच प्रतिनिधीत्व करत असतांना आज मला आनंद होतो की, मा.जिल्हाधिकारी सो., या सभागृहात उपस्थित असतील. या शहराशी निकट असलेला आणि या पदाशी निकट असलेला समांतर रस्तेचा विषय त्यांच्याशी करण्याची सुध्दा माझी ईच्छा होती. की जेणे करुन त्या विषयाला सुध्दा चालना मिळाली असती. किंवा त्याच्या बाबतीत सत्य परिस्थिती काय आहे ती सुध्दा सभागृहाला आणि या सभागृहाच्या माध्यमातुन संपुर्ण शहराला अवगत झाली असती. परंतु दुर्देव आहे की आज ते अनूपस्थित राहिले. या अनुषंगाने योग्य ते निर्देश प्रशासनाला अवगत करावे. महापौर साहेब विषय क्र.३ ते ११ चर्चा करणे सारखे नाही. ज्या विषयांवर चर्चा करायची आहे. फक्त त्यांच्यावर चर्चा करावी.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** भुसंपादनाचे सोडुन बाकी सर्व विषय मंजुर करायचे आहे. फक्त ७ आणि ८ मध्ये माझी अशी सुचना आहे. मनपाची आर्थिक परिस्थिती पाहता त्यांना टी.डी.आर. देण्यात यावा. विषय क्र.१ ते ६ सगळे मंजुर आहे.

**नगरसचिव :-** मा.महापौर महोदया यांच्यावतीने माझी सर्व सभागृहाला विनंती आहे की, पहिले विषयपत्रिकेवरचे सर्व विषय संपवुन घ्यावे.

**श्री.नितीन लढढा :-** प्रत्येक विषयाचे वाचन प्रत्येक सभासद घरुन करुन येत असतात हया सभागृहात संपुर्ण उपस्थित असलेली संख्या ज्या वेळेला कुठल्याही विषयाला समर्थन करत असतांना उगाच त्यावर भाष्य करणे मला वाटत अपेक्षित नाही ज्या वेळेला सभासदांना शंका असेल त्यावेळेला ते निश्चितपणे ते मांडु शकतील.

**श्री.कैलास सोनवणे :-** दोन नंबरचा जो विषय आहे. एका कार्यकर्त्यांने त्याचे बळावर इतके पैसे महापालिकेत मंजुर करुन आणल्याची ही पहिलीच घटना आहे. येथे दलितस्तीचे ५ करोड २७ लाख रुपये आणलेले आहे. आमचे नगरसेविका आहे सुरेखा तायडे यांचे मिस्टरांनी त्यांच गुडविल वापरुन ते पैसे अणलेले आहे त्यांच्या वार्डासाठी तर मी त्या ताईंचही अभिनंदन करतो आणि त्यांना विनंती करतो की तुम्ही तुमच्या मिस्टरांना सांगा की, या शहरात ५ वार्ड आहे दलितवस्तीचे पुढच्या वेळेस त्या वार्डासाठी ही त्यांनी प्रयत्न करावे. आणि त्या वार्डासाठी सुध्दा त्यांनी निधी आणुन द्यावा आम्हाला. आणि ताईच ही अभिनंदन करतो.

**श्री.नितीन लढढा :-** उर्वरीत शहरासाठी आपण ही प्रयत्न करा ही आमची तुम्हाला विनंती आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** ७ आणि ८ मध्ये मनपाची आर्थिक परिस्थिती पाहता टी.डी.आर. देण्यात यावा. बाकी सर्व विषयांना मंजुरी देण्यात आलेली आहे. आता नितीन भाऊंनी जो भुसंपादनाचा विषय मांडला होता. नितीन भाऊंचा विषय योग्य पॉईंट आऊट केलेला आहे की आयुक्त साहेब आता सभेला हजर नाही. तर चर्चा कोणाशी करायची, प्रशासन म्हणुन येथे चर्चा कोण करणार. मला वाटत ही खुप स्वागतार्ह बाब आहे. या विषयावर सत्ताधारी गट आणि विरोधी गट ज्यांच एक मत आहे. बऱ्याचदा आपण बघता की, एकमत नसत आणि त्याच्यामुळे वाद वाढत. पण येथे सत्ताधारी आणि विरोधी यांच भुसंपादनाबद्दल भुसंपादन क्र.५८,५९,६० या बद्दल मी येथे बोलते. आजचा माझा बोलण्याच अर्थ आहे की, कलेक्टर साहेब नाही त्यामुळे या विषयांचा निर्णय कोण घेईल. फक्त आता बोलण्याच प्रयोजन हेच आहे की, आपले सभागृहातील जे सदस्य आहे, मला वाटत फार कमी सदस्यांना या विषयाबाबत माहिती आहे. सगळे सदस्यांना विषयाच गांभिर्य कळाव आणि इतक्या मोठया रितीने पदाधिकारी हा विषय का लावुन धरला आहे. मनपाच हित जोपासण्यासाठी का प्रयत्न करता आहे. ही माहिती सदस्यांपर्यंत पोहचावी. म्हणुन आज मी येथे बोलणार आहे. २००७ मध्ये ५८,५९ आणि ६० असे तीन भुसंपादनाचे प्रस्ताव आलेले होते, हे पण त्याच जमिनीचे भुसंपादनाचे प्रस्ताव होते. प्रत्यक्ष वस्तुस्थिती जर बघितली तर त्या जमिनीवर नाला आहे. आपल्या भाषे मध्ये आपण म्हणतो की, पोट खराब ती जमिन आहे. अश्या जमिनीवर शाळा आणि क्रिडांगणाचा हा विषय आहे. जे प्रॅक्टीकली पॅसिबलच नाही. त्या ठिकाणी हा विकास करणे. ज्यासाठीच आरक्षण आहे. त्या जागी त्याच विकासच करण शक्य नाही.म्हणुन दि.०७/१२/२०१८ ला महासभेने एक ठराव केलेला होता की, आपण हा भुसंपादन प्रस्ताव आम्ही मागे घेतो आहे. आणि मला वाटत हा ठराव अत्यंत कायदेशीर होता.लॅण्ड ॲक्वीजेशनचा जे सेक्शन ९० डी आहे. ते आपल्याला पर्मीशन देत की, आपण जर जागेचे पर्मीशन घेतलेल नाही. तर महासभा महापालिकेत सर्वोच्च सभा असते. सर्वात अधिक अधिकार हे महासभेला असतात. ज्या वेळेला सर्वानुमते महासभेत एखादा ठराव होतो. त्याच इमप्लीमेंटेशन होणे हे अत्यावश्यक आहे. महासभेने हा ठराव केलेला होता की, वस्तुस्थिती पाहता, त्या ठिकाणी स्पॉट व्हिजीट केल्यानंतर ती जागा भुसंपादन करणे योग्य नाही. ज्यासाठी ते आरक्षण घेतलेलं आहे ते आरक्षण विकसीत होऊ शकत नाही. त्यामुळे महासभेने भुसंपादनाचा प्रस्ताव मागे घेतलेला आहे. आणि सदरची बाब ताबडतोब जिल्हाधिकारी कार्यालयाला कळविलेली आहे. माझ्याकडे त्याच सगळ आहे, तारखा, जावक नंबर आवक नंबर सगळ आहे. मी साधारणता आपल्याला जनरल माहिती देत आहे. या नंतर प्रधान सचिव यांना नगरविकास मंत्रालयाला सुध्दा आपण महासभेत झालेल्या ठरावाबद्दल २३ सप्टेंबरला कळविलेल आहे. आणि त्यांनी सुध्दा शासनाने भुसंपादन अमान्य करण्याची मान्यता द्यावी अस कळविलेल आहे. अस सगळ झालेल असतांना जर काही शक्ती भुसंपादनापोटी रक्कम अदा करण्याच्या मानसिकतेत असतील. तर ते थांबविणे मला वाटत महापालिकेचे पदाधिकारी म्हणुन आपली जबाबदारी असते. म्हणजे सत्ताधारी गट असो किंवा विरोधी गट, आपल्याही लोकांनी येथे पाठवलेलं कशासाठी आहे, आपण जळगांव शहराच्या जनतेच प्रतिनिधीत्व येथे करतो, जनतेच हित, महापालिकेचा पैसा, एक एक पैश्यांच मोल लाख मोलाचा आहे. महापालिकेच्या पैश्यांच सुलोख नियोजन झाल पाहिजे. आज जळगांव शहरामध्ये अनेक प्रश्न आहे अनेक विकासाचे कामं आहे. जे पैश्यांच्या अभावी रखडलेले आहे. आणि अश्या परिस्थितीत आपण भुसंपादनापोटी कोटयावधी रुपये अदा करणार आहोत. अश्या मिळकतीचे ज्यांना मिळकतीची गरजच नाही. अश्या जमिनीचे जिथे विकास होऊच शकणार नाही. तर अश्या जमिनीचे पैसे का अदा करायचे, महापालिकेने ठराव केलेला असतांना ते सगळ मुदतीत सर्वांना कळविलेल असतांना आणि आपल्याला भुसंपादन प्रस्ताव कोणत्याही स्टेजला नाकारण्याचा पुर्ण अधिकार असतांना हे प्रकरण येथे थांबल पाहिजे. आणि ते थांबत नाही तर सगळयांनी एकत्रीत येऊन याच

विरोध करण आणि निर्णय घेण आजच्या सभेत अपेक्षित होत.पण प्रशासनाकडुन जबाबदार व्यक्ती नसल्यामुळे ते होणार नाही. पण तरी सुध्दा आपण सगळयांनी जागृत राहणे खुप आवश्यक आहे. असच काही महिन्यांपुर्वी १२ कोटींची बिल हा विषय खुप गाजलेला होता. तेव्हा सुध्दा आपण सर्वांनी विरोध करुन ही मला वाटत त्याच्यातले पैसे अदा करावे लागलेले आहे. तर जनतेचे पैसा वाचविण आणि योग्य तो निर्णय घेण ही आपली जबाबदारी आहे. प्रशासनाने समजुन घेतल पाहिजे. खर तर मी कलेक्टर साहेबांना ज्यांच्याकडे प्रभारी आयुक्त म्हणुन पदभार दिलेला आहे, त्यांना आयुक्त म्हणुन अॅडरेस करुन पत्र सुध्दा दिलेल आहे. या विषया संदर्भात उच्च न्यायालयातुन काही निकाल आपल्याला अपेक्षित असतील. तर ते सुध्दा त्यांनी ताबडतोब करावे. अस विनंती पत्र मी त्यांना दिलेले आहे. जेवढा माझ अभ्यास सांगतो, आपल्याला न्यायालयात जाण्याची सुध्दा गरज नाही. कारण विषयाच्या जर आपण खोलात गेलो. तर अस दिसत आहे आपल्याला की, जी १५ लाखात जमिन घेतली, त्या जमिनीचे आपण ४ कोटी देतो आहे. आणि हे ३ भुसंपादनाबाबत आपण १७ ते १८ कोटी अदा करणार आहोत. अर्थात आपण महासभेचा ठराव केलेला आहे. तो ठराव आपण जिल्हाधिकाऱ्यांना सुध्दा पाठविलेला आहे. आणि प्रधान सचिवांना सुध्दा मंत्रालयात सुध्दा पाठविलेला आहे. हे पैसे अदा होणार नाहीत तर आपल्याला जागृत राहणे तेवढेच आवश्यक आहे. आपण येथे कमी पडायला नको, जशी १२ कोटींची अदायगी केली तशी १८ कोटी मध्ये आपण तो नाला घेऊ आणि तेथे कोणताही विकास होऊ शकणार नाही. त्यावेळेला जेव्हा हा अॅडव्हान्स दिलेला होता. त्यावेळेला आपण ताबडतोब मुदतीत आपले आक्षेप नोंदविलेला आहे की, ही जमिन योग्य नाही. हे सगळे आक्षेप नोंदविलेले आहे. ही सर्व गोष्टी मुदतीत झालेली आहे. आणि नाशिक विभागीय आयुक्त कार्यालयाकडुन निवाळा रद्द करण्याबद्दलचे सुध्दा आदेश झ ालेले आहे. ज्यांनी आक्षेप घेतलेले आहे ते मुदतीत आणि योग्य आहे. तरी सदर निवाळा प्रकरणी सहा.संचालक नगररचना यांना निवाळयाची प्रत देऊन आवश्यक तो अभिप्राय घेण्यात यावा. सहा.संचालक, नगररचना विभागीय आयुक्त कार्यालयाचा भुसंपादनाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदर प्रकरणी योग्य तो निर्णय घेण्यात यावा. हे सर्व जे मी सांगत आहे ते सन २०१७ बद्दल सांगत आहे. आणि सन २०१८ मध्ये हा भुसंपादनाचा प्रस्ताव आपण मागे घेतलेला आहे. हे प्रकरण सर्वांनी मान्य करुन नाकारलेला आहे. आणि सेक्शन ९० डी खाली महासभेला पुर्ण अधिकार प्रदान करत. महापालिकेच्या बाजुने कोणतीही कमतरता ठेवलेली नाही. सगळया फॅरमॅलिटीज कम्पलीट केलेल्या आहे आणि हे १७-१८ कोटी भुसंपादनात अजीबात जायला नको. ही प्रशासनाला विनंती आहे. उपायुक्त मुठे साहेब आज प्रशासनाला रिप्रेझेंट करत आहे त्यांनी या सर्व गोष्टींची नोंद घ्यावी. आणि खुप मोठी सुचना की, भुसंपादनाचे असे जे जे विषय येत असतात. तर मला वाटत आपण सर्वांनी मिळुन ते ठरवायला हवे आहे की, आपण अस म्हणु शकत नाही की, भुसंपादनाचे सर्व प्रस्ताव सरसकट रद्द करा. कारण ही आपल्या पुढच्या पिढीसाठीची गरज असणार आहे. काही काही जागा भुसंपादन करणे आणि त्या त्या आरक्षणानुसार विकास करणे पुढच्या काळाची गरज असणार आहे. बदलत्या शहराची, वाढलेल्या शहराची गरज असणार आहे. भुसंपादनाच्या प्रस्तावामार्फत जागृत असावे आणि प्रशासनाने सुध्दा पदाधिकाऱ्यांच म्हणण एकुन घेणे त्याची योग्य ती नोंद घेणे आणि त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**श्री.नितीन लढढा :-** मा.महापौरताई आज उपायुक्त साहेब येथे बसलेले आहे आयुक्त यांच्या स्थानावर, या संपुर्ण याच्या अनुषंगाने नेमक प्रशासनाच्या पदात काय चाललेल आहे. आणि प्रशासन याच्या संदर्भात समाधानकारक उत्तर देऊ शकेल का ? जर असेल तर प्रशासनाने सभागृहाला उत्तर उवगत करावे अशी प्रशासनाला विनंती आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** हा विषय शुचिताताईंनी मांडला नितीन भाऊंनी मांडला, हे भुसंपादनाचे विषय आले की, आमचा जिव घबरायला लागतो. सगळे इतके बोगस प्रकरण येतात. आम्हाला त्रास झालेला आहे. आणि बाकीच्यांना त्रास होऊ नये अशी आमची ईच्छा आहे. पुर्वीची एक म्हण आहे की, शेतात नाला आणि घरात साला नको आहे ते. दोन तुकडे करुन टाकतात ते. ही जी जागा ताईंनी सांगीतली त्यात बाजुने नाला नाही, तो मधुन आहे. त्या प्रॉपर्टीचे दोन भाग झालेले आहे आणि आणखी सांगतो एक माहिती. त्याला अॅपरोच नाही कुठुनच म्हणजे आता आपण जाऊ शकतो पण त्याच्या प्लॅनींग मध्ये अॅपरोच नाही. त्या ठिकाणी ६० रुपया पेक्षा जास्त भाव नसतील त्या ठिकाणी, आपल्या डिपार्टमेंट मध्ये पण या लोकांची मिलीभगत असते साहेब. हे सगळ प्लॅनींगने करतात साहेब. एखादा जर प्रामाणिक निघाला ना. तर या लोकांची चलतीच बंद होईल. बंद पडतील हे प्रकरण. परंतु काही भाव नसतांना इतके पैसे द्यायचे. तुम्ही हे सर्व सदस्यांची भावना साहेबांना कळवा. आणि असे करु नका. दुसऱ्या काही कामात येतील ते पैसे. लोकांसाठी कामात येतील.

**श्री.नितीन लढढा :-** मा.महापौरताई, या विषयाची सुरुवात खरे अर्थाने मी महापौर असतांना झालेली आहे. मी या प्रस्तावाला आयत्यावेळेला घेऊन तत्कालीन प्रशासनाने हा प्रस्ताव दिला होता. आप्पा मी हा विषय आयत्यावेळेला घेऊन त्याच गांभिर्य बघता या प्रस्तावाला घेतला होता. परंतु जमीन मालकाने माझ्या नंतर सुध्दा, पोलीस स्टेशन पासुन अॅन्टी क्रप्शन डिपार्टमेंट पर्यंत तक्रारी दिलेल्या आहे. मला कधी ही पोलिस स्टेशन मधुन बुलावा आला नाही किंवा अॅन्टी क्रप्शन मधुन सुध्दा बुलावा आला नाही. परंतु ज्या वेळेला महानगरपालिकेचा हित जोपासत असतांना अश्या पध्दतीचे जे भुमाफीया असतात ते कश्या पध्दतीने वागले जातात आणि कश्या पध्दतीने या महानगरपालिकेला लुबाडण्याच काम करतात. हे खुप मोठ रॅकेट आहे.

म्हणजे जागेच मुल्यांकन करणे पासुन जागेचा मोबदला मिळे पर्यंत ही एक यंत्रणा आहे आणि ही सर्व यंत्रणा मिळुन अश्या पध्दतीने भुसंपादनाच्या नावा खाली कोट्यावधीचा धंदा या महानगरपालिकेत चालत असतो. या नंतरही जर असे प्रस्ताव भुसंपादनाचे येत असतील. तर त्याची भुमिका प्रशासनाने सुपध्दतीने बघायला पाहिजे. कारण ते या महानगरपालिकेच्या पेरोल वर आहेत. पगार महानगरपालिकेचा घ्यायचा आणि मात्र चाकरी भुमि मालकाची करायची हा जो प्रकार आहे त्याच्यावर कुठेतरी बंदी लागली पाहिजे.

**श्री.सचिन पाटील :-** नितीन भाऊ आणि ताईंनी आम्ही नविन सदस्यांना चांगली माहिती या विषयाबाबत दिलेली आहे ती आम्हाला चांगली सुचवलेली आहे. पण आता पर्यंत प्रशासनाकडुन नगररचनाकारांनी कधी ही या विषयावर अहवाल बोलेले नाही. आज अपेक्षा इतकीच करतो की, नगररचनाकार साहेबांनी याच्यावर माहिती द्यावी. या बाबत अजुन शासकीय दृष्ट्या काय आहे, हा प्रस्ताव विखंडन करुन जमिन मालकाला परत करता येईल का ?

**सहा.संचालक, नगररचना विभाग :-** महासभेने निर्णय घेतलेला आहे त्या अनुषंगाने आपण शासनास प्रस्ताव दिलेला आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** या सभेमध्ये सदस्य त्यांचे विचार मांडत असतात. आणि मग अश्या प्रकारे त्यांचे चौकश्या लावुन देतात. नितीन भाऊ मी तुम्हाला सांगतो, आपले एक मार्केट मध्ये गांधी मार्केट मध्ये डायरेक्ट लावुन सट्टयाची दुकान चालु होती. त्याची तक्रार मी केलेली होती, तर माझी ॲन्टी क्रप्शन चौकशी लावुन दिली. माझी चौकशी झालेली आहे. तुमची ॲन्टी क्रप्शन चौकशी झालेली नाही. मला त्रास झालेला आहे खुप, मला डेली नाशिकला जाव लागायच. या ऑफिसला त्या ऑफिसला. आणि मी एकटा नगरसेवक होतो आणि सात आमदारांचे लोकं होते. तर असे प्रकार घडतात. म्हणुन मांडु नाही येथे काही. मी साहेबांना सांगितल की, सट्टयाच दुकान बंद केल म्हणुन माझी चौकशी लावलेली आहे. तर असे प्रकार घडतात.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** आता ताईंनी सांगितल की, ती जागा काही कामात येणार नाही भुसंपादन केल्यानंतर मागे एक उल्लेख केला १२ कोटी रुपयांच्या शिवाजी नगर जागेचा त्या ठिकाणी घरकुल बांधले गेलेले आहे. उतारा लागला, पेमेंट दिले गेलेले आहे तेथे, बाकी माझ्या सभागृहाला एक विनंती आहे. नगररचना विभागाला माझ अस सांगण आहे की, आपण आपल्याकडे जितकेही प्राप्त झालेले भुसंपादनाचे प्रस्ताव आहे त्याच एक विवरण तयार कराव. विवरण तयार केल्यानंतर तुम्ही स्वत: हुन एक रिपोर्ट तयार करावा. किती जागा आपल्याला आवश्यक आहे. किती घेण्यासारख्या आहे. आणि किती भुसंपादन आपल्याला करता येत नाही. आणि तुम्ही ती सभागृहाला माहिती दिल्यानंतर असा ठराव जाईल की, भुसंपादनासाठी इतके इतके प्रस्ताव आल्यानंतर त्या पैकी ३० प्रस्ताव मान्य झालेले आहे आणि आपल्याला त्याप्रमाणे धोरण ठरविता येईल.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** ५ आणि ६ नंबरच्या विषयावर सुचित करतो की, बदली करणेच्या संदर्भात प्रमाणपत्र मागत आहे. त्या विषयावर बोलणे हे आहे नाही द्यायचे असे नाही. आता काही काही कर्मचारीला अधिकारीला ८-८ व १०-१० पदभार दिलेले आहे. ती संख्या कमी होत आहे आपली. आता जे उर्वरीत पद आहे त्याची लवकरात लवकर तुम्ही पुर्तता करा विभागांसाठी. आता एप्रिल ला १०० कर्मचारी आपले कमी होत आहे. तर त्यासाठी काही ना काही करायला पाहिजे. आता एका पगारात तुम्ही १०-१० विभाग देत आहे लोक कसे कामे करतील. कायद्यात जे काही तरतुद असेल ती लवकरात लवकर करा.

**मा.उपायुक्त श्री.अजित मुठे :-** यासाठी जो आकृतीबंध आहे तो आपण मंत्रालयात सादर केलेला आहे. आता पर्यंत मी दोन ते तीन वेळा मिटींगसाठी जावुन आलेलो आहे. आकृतीबंध तयार होईल तो पर्यंत तुम्ही सेवाजेष्ठता यादी तयार करा. सेवाजेष्ठता यादी तयार केल्यानंतर प्रमोशनचे प्रस्ताव उपस्थित करता येतील. आणि आकृतीबंध मंजुर झाल्यानंतर पुढील कार्यवाही शासनाची परवानगीने आपल्याला करता येईल. आणि त्याप्रमाणेच पुढचेही विषय करता येईल.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** आस्थापना विषयामध्ये आपले बरेच कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहे. परंतु अनुकंपाची जी भरती आहे. ती आपली बऱ्याच वर्षापासुन पेन्डींग आहे. त्याप्रमाणे त्या लोकांची आपण भरती केली नाही. तर ते लोक ऐज बार होतील. त्याच वय निघुन जाईल. आणि आपले मनपात जर महिन्या भरात जर आपण त्यांना भरती करुन ती प्रक्रिया पुर्ण केली तर बर होईल. कारण आयुक्त साहेबांशी पण मी दोन तिन वेळा बोललो होतो. त्यांना मला त्यावेळी कारण सांगितल होत की, मनपावर भार पडेल. पण जे सेवानिवृत्त होत आहे त्यांच पगार ही आपल्या महापालिकेत वाचतोच आहे. त्यांना सुरुवातीच बेसिक पगार देऊन आपण महापालिका कर्मचारी करु शकतो आणि तो त्यांचा हक्क ही आहे. त्या हक्कावर गदा येणार नाही. फक्त याची काळजी प्रशासनाने घ्यावी.

**श्री.कैलास सोनवणे :-** साहेब आता अनुकंपाचे प्रकरण किती प्रमाणात घेता. ५% नाही १% आहे. अस काही नाही. जो अमलबजावणी करतो त्याच्या मनावर आहे. तुम्ही यादी मागुन टाका आणि भरती करुन टाका, मागे सोनवणे साहेबांनी तसे केलेले आहे. काय फरक पडणार. तपासुन घ्या मागे तुम्ही, सोनवणे साहेबांनी डायरेक्ट भरलेले आहे. काही पक्ष नाही आणि काही नाही. आपल्या मनावर आहे ते. मला अस वाटत, एका आयुक्तासाठी वेगळ नियम आणि आपल्यासाठी वेगळ कसा

असु शकेल. पण त्यांनी पॉझिटीव्ह थिंकींगने सर्व काम केल साहेब सकारात्मकतेने काम करा साहेब. म्हणजे तुम्हाला मुला ऑर्डर करण्याची पध्दतही १८ वर्षाच्या नंतरच आहे. १८ वर्षनंतर ऑर्डर करावा लागतो. म्हणजे का १०० रिटायर होतील तेव्हा तुम्ही १० घेणार. ती यादी वाढते परत आणखी. म्हणजे ऐज बारच होणार वय ३१ आहे की ३३ आहे.

**मा.उपायुक्त श्री.अजित मुठे :-** त्याची लिमीट ३८ आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** म्हणजे तो वयाच्या ३० व्या वर्षी जरी लागला तर तो जास्त सेवा करु शकत नाही. प्रॉब्लेमच आहे ना त्याला १२ वर्षासाठी कुटुंबाचा. तुम्ही सकारात्मक दृष्टीने चेक करा मागच आणि करुन टाका ते. खुप लोकांचे वेटींग आहे.

**नगरसचिव :-** विषय क्र.७ व ८ ला टी.डी.आर. आहे ना, आणि ९,१०, व ११ चे काय ?

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** तो ठराव तसाच पारीत करण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २४५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका मधील अनुसुचित जाती करीता आरक्षीत प्रभाग क्रं.१३ मधील विकास कामे नागरी दलित वस्ती सुधारणा योजना २०१९-२०२० अंतर्गत प्रस्तावित करणे कामी जिल्हाधिकारी कार्यालय जळगांव यांचे कडील पत्र क्रं.नपा/१/सुनयो/१७३/२०१९ दि.२६/१२/२०१९ अन्वये अतिरिक्त निधी मिळणेकामी मागणी केलेप्रमाणे आवश्यक कार्यवाही करण्यात येवुन जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणेबाबत कळविले आहे. त्यानुसार नमुद कामांचे अंदाजपत्रक सी.एस.आर.२०१९-२० प्रमाणे करण्यात आले असुन ते खालील प्रमाणे आहेत.

१. प्रभाग क्रं.१३ मध्ये गटार / नाला बांधकाम करणे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्र.क्रं.१३ अंतर्गत रायसोनी नगर भागात आर.सी.सी.गटार बांधणे | २१,९८,२२४/- |
| २ | प्र.क्रं.१३ अंतर्गत राकेश नगर, गजानन नगर भागात आर.सी.सी.गटार बांधणे | १०,८४,७२०/- |
| ३ | प्र.क्रं.१३ अंतर्गत समता नगर भागात आर.सी.सी.गटार बांधणे | ७,७०,५७९/- |
| ४ | प्र.क्रं.१३ अंतर्गत भागात ठिकठिकाणी आर.सी.सी.गटार बांधणे | ३३,७४,७४०/- |
| | एकुण :- | ७४,२८,२६३/- |

२. प्रभाग क्रं.१३ मध्ये रस्ते कॉक्रीट / डांबरीकरण करणे.

| **अ.क्र.** | **कामाचे नांव** | **अंदाजित रक्कम** |
|---|---|---|
| १ | प्र.क्रं.१३ मधील मेहरुण स.नं.४५४ राकेश नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे | ३६,९७,५७८/- |
| २ | प्र.क्रं.१३ मधील मेहरुण स.नं.४५५/४,४६० रायसोनी नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे | ७८,९१,०२८/- |
| ३ | प्र.क्रं.१३ मधील मेहरुण स.नं.४६१/१, ४६२ रायसोनी नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे | ४२,८९,४५१/- |
| ४ | प्र.क्रं.१३ मधील मेहरुण स.नं.४५१ नित्यानंद नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे | ३४,३६,७४६/- |
| ५ | प्र.क्रं.१३ मधील मेहरुण स.नं.४५२ संभाजी नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे | ५०,२९,४२८/- |
| ६ | वार्ड क्र.१३ मधील रायसोनी नगर मधील १२ मी विकास योजना रस्ते कॉंक्रीटचे करणे. | ७४,८८,१८९/- |
| ७ | प्र.क्रं.१३ मधील मोहननगर मधील जास्त उताराचे रस्ते कॉक्रीटचे करणे | ३१,५०,८७५/- |
| ८ | प्र.क्रं.१३ रायसोनी नगर मेहरुण शिवार स.नं.४५६/१ मधील रस्ते डांबरीकरण करणे | २७,७३,७५०/- |
| | एकुण :- | ३,७७,५७,०४५/- |

३. प्रभाग क्रं.१३ मध्ये समता नगर पाण्याच्या टाकीला संरक्षण भिंत बांधणे

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्र.क्रं.१३ मधील मेहरुण स.नं.४६२/१/२ मधील समता नगर जलकुंभास संरक्षण भिंत बांधणे. | ४९,२५,२९४/- |

४. प्रभाग क्रं.१३ मध्ये ओपनस्पेस मध्ये बगीचे विकसीत करणे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्र.क्रं.१३ मधील राकेश नगर मेहरुण स.नं.४५५/४ मधील ओपनस्पेसला चेनलिंक फेन्सींग करणे. | १२,५७,८४३/- |
| २ | प्र.क्रं.१३ मधील रायसोनी नगर मेहरुण स.नं.४५६/१ मधील ओपनस्पेसला चेनलिंक फेन्सींग करणे. | १३,७६,८६३/- |
| | एकुण :- | २६,३४,७०६/- |

वर नमुद कामांची एकुण अंदाजित रक्कम रु.५,२७,४५,३०८/- मात्र चे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे तसेच सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडेस प्रशासकीय मान्यतेकरीता सादर करणे व जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन रक्कम रु.५,२५,००,०००/- मात्र कामांचे अंदाजपत्रक सादर करण्यास सुचित केले आहे त्यानुसार रक्कम रु.५,२५,००,०००/- मात्र अनुदान मिळाल्यास जादा होणारा खर्च रक्कम रु.२,४५,३०८/- मात्र मनपा निधीतुन करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६३ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- तायडे सुरेखा नितीन**

**अनुमोदक :- पाटील कुलभूषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ३)** मक्तेदार स्वामीकृपा मजुर सह. संस्था पिंपळकोठा खुर्द यांची मनपा जनरल फंडात जमा असलेली एकूण रक्कम रु.७४००/- मात्र कालबाहय इसारा अनामत परत करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री. धिरज सोनवणे :-** विषय मान्य आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.२४६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की,१) प्र.स.क्र.०२ अ.नं.०९ बागवान मोहल्यातील रस्ते रिपेअर करणे. (२) प्र.स.क्र.०२ अ.नं.१० कासाबाई खडके व इतर ठिकाणी रस्ते कॉक्रींटचे करणे (३) यु.क्र.०३ वार्ड क्र.२९ भावसार गढी ते रमेश भावसार यांच्या घरापर्यंत कॉक्रींटकरण करणे कामी मक्तेदार स्वामीकृपा मजुर सह. संस्था पिंपळकोठा खुर्द यांनी पावती क्रं.७९ दि.०४/०७/२०११ अन्वये रक्कम रु.२३००/-, पावती क्रं.८० दि.०४/०७/२०११ अन्वये रक्कम रु.३५००/-, व पावती क्रं.१८६७४ दि.२४/०५/२०१२ अन्वये रक्कम रु.१६००/- याप्रमाणे एकुण रक्कम रु.७४००/- मात्र मनपा खजिन्यात भरलेली असुन सदरची कामे मनपा निधी अंतर्गत पूर्ण करण्यात आलेली असल्याने तसेच सदरची इसारा अनामत तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने जनरल फंडात जमा करण्यात आलेली इसारा रक्कम रु.७४००/- मात्र मक्तेदार स्वामीकृपा मजुर सह. संस्था पिंपळकोठा खुर्द यांना परत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६३ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- सोनवणे धिरज मुरलीधर**

**अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ४)** यु.क्र.०३ अंतर्गत वार्ड क्र.२९ मध्ये गटार तोडुन नविन आर.सी.सी.गटार बांधणे कामी मक्तेदार स्वामीकृपा मजुर सह. संस्था पिंपळकोठा खुर्द यांची मनपा जनरल फंडात जमा असलेली एकूण रक्कम रु.६७५०/- मात्र कालबाहय इसारा अनामत परत करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री. धिरज सोनवणे :-** विषय मान्य आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २४७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, यु.क्र.०३ अंतर्गत वार्ड क्र.२९ मध्ये गटार तोडुन नविन आर.सी.सी.गटार बांधणे कामी मक्तेदार स्वामीकृपा मजुर सह. संस्था पिंपळकोठा खुर्द यांनी पावती क्रं.१० दि.२७/०६/२०११ अन्वये रक्कम रु.६,७५०/- मात्र मनपा खजिन्यात भरलेली असुन सदरचे कामे मनपा निधी अंतर्गत पूर्ण करण्यात आलेली असल्याने तसेच सदरची इसारा अनामत तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने जनरल फंडात जमा करण्यात आलेली इसारा रक्कम रु.६,७५०/- मात्र मक्तेदार स्वामीकृपा मजुर सह. संस्था पिंपळकोठा खुर्द यांना परत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६३ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- सोनवणे धिरज मुरलीधर**

**अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ५)** श्रीमती जया लक्ष्मण केदार यांची जळगांव महानगरपालिकेतील लिपीक या पदाची सेवा अमरावती महानगरपालिकेतील लिपीक संवर्गातील रिक्त पदावर बदलीने नेमणूक देणेकामी ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. सुनिल खडके :-** विषय मान्य आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.२४८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, श्रीमती, जया लक्ष्मण केदार,लिपीक,पाणी पुरवठा विभाग यांचा दि.०९/०९/२०१९ रोजीचा विनंती अर्ज प्रशासनास प्राप्त झालेला आहे. अर्जात श्रीमती.केदार यांनी अमरावती महानगरपालिकेत असलेल्या लिपीक संवर्गातील रिक्त पदावरील जागी बदलीने नेमणूक देणेबाबत आपले ना-हरकत पत्र मिळणेस व त्याबाबत महासभेचा निर्णय घेवून तसा ठराव पारित करुन मिळणेबाबत नमूद केले आहे.

श्रीमती. जया लक्ष्मण केदार यांची अंतर्गत जा.क्र/आस्था/१९२९/०९/११/२०१२ अन्वये मागासवर्गीय सरळसेवा अनुशेष भरती अंतर्गत दि.३०/११/२०१२ रोजी अनु.जाती (SC) प्रवर्गातून लिपीक या पदावर वेतनश्रेणी रु.५२००-२०२००/- ग्रेड पे रु.१९००/- मध्ये कायम पदावर नियुक्ती झालेली आहे. व हल्ली त्या लिपीक म्हणून बारनिशी विभागात येथे कार्यरत आहेत. त्यांचे मूळगांव अमरावती असून त्या तेथील रहिवाशी आहेत. त्यांच्या घरात आईवडील वयोवृध्द असून सदयस्थितीत ते विविध आजाराने त्रस्त झालेले आहेत. श्रीमती केदार हया घरात सर्वात मोठी मुलगी असल्याने घराची व वृध्द आईवडीलांची संपूर्ण जबाबदारी ही फक्त त्यांच्यावर आहे. त्यांचे सासर हे अमरावतीचेच असून त्यांच्या पतीचा खाजगी व्यवसाय हा सुध्दा अमरावती येथेच आहे आणि त्यांना ११ महिन्याचे छोटे बाळ असल्यामुळे बाळाच्या संगोपनास त्यांची खूप ओढताण होत आहे. त्यामुळे त्यांची प्रचंड प्रमाणात आर्थिक व मानसिक ओढाताण होत आहे. त्यामुळे

त्यांच्या छोटया बाळाकडे आणि आईवडीलांकडे पुर्ण लक्ष दिल्या जात नाही. म्हणून श्रीमती केदार यांनी अमरावती महानगरपालिकेत असलेल्या लिपीक संवर्गातील रिक्त पदावरील जागी बदलीने नेमणूक देणेबाबत ना-हरकत पत्र मिळणेस व त्याबाबत म.न.पा.सभेचा निर्णय घेऊन तसा ठराव पारीत करुन मिळण्याची विनंती केली आहे. श्रीमती जया लक्षमण केदार यांनी केलेल्या अर्जाबाबत महाराष्ट्र शासनाने शासन परिपत्रक क्र.SRV-१०९७/प्र.क्र.२०/९७/बारा,दि.२७ नोव्हेंबर, १९९७ अन्वये शासकीय सेवकांच्या नियतकालिक बदल्यासंदर्भात ठरविलेल्या धोरणानुसार विचार करता येईल.

तसेच त्यांचे सेवापुस्तक पाहता त्यांचे विरुद्ध विभागीय चौकशी प्रस्तावित नाही. तसेच त्यांचेकडेस काहीएक बाकी घेणे नाही. तसेच लेखा परिक्षणात त्यांचेबाबत कोणताही आक्षेप नाही. परिपत्रकातील सुधारीत धोरण क्र.०२ नुसार त्यांचा सेवेचा जिल्हयातील कार्यकाळ सुमारे ५ वर्षे झालेला असून परिपत्रकातील मुद्दा क्र. ४ नुसार त्यातील (अ) व (ब) नुसार त्यांनी कळविलेली पसंती,त्यांची प्रशासकीय सोय व वैयक्तिक पसंती विचारांत घेता श्रीमती, जया लक्ष्मण केदार, लिपीक, बारनिशी विभाग यांची अमरावती महानगरपालिकेतील रिक्त असलेल्या लिपीक संवर्गातील पदावरील जागी आंतरजिल्हा बदलीने नेमणूक होणे कामी ना-हरकत प्रमाणपत्र देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६३ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- खडके सुनिल वामनराव**

**अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ६)** श्री.प्रविण विलास पाटोळे, फिटर, पाणी पुरवठा विभाग यांची जळगांव महानगरपालिकेतील फिटर या पदाची सेवा माढा नगरपंचायत, माढा येथे बदलीने नेमणूक देणेकामी ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. सुनिल खडके :-** विषय मान्य आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.२४९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, श्री.प्रविण विलास पाटोळे, फिटर, पाणी पुरवठा विभाग यांचा दि.२०/११/२०१९ रोजीचा विनंती अर्ज प्रशासनास प्राप्त झालेला आहे. अर्जात श्री.पाटोळे यांनी आईवडील माढा गावात राहतात वृध्दपकाळाने त्यांची प्रकृती ठिक राहत नसल्याने ते आजारी असतात जळगावहुन त्यांचे गांव ५०० कि.मी.दुर असल्याने त्यांची देखभाल करणे शक्य होत नाही त्यामुळे त्यांचा सांभाळ करणे गैरसोईचे होते. तसेच पाटोळे यांची मुलगी कु.सानिका प्रविण पाटोळे (वय १० वर्षे) ही १००% अपंग (दोन्ही कानांनी कर्णबधीर) आहे. त्यामुळे त्यांचे कुटुंबाची गैरसोय होत असल्याचे अर्जात नमुद करुन त्यांची बदली माढा नगर पंचायत ता.जि.सोलापुर येथे नेमणुक मिळण्यासाठी ना-हरकत व म.न.पा.सभेची (मंजुरीचा ठराव) सहमती मिळण्याची विनंती केलेली आहे.

श्री.प्रविण विलास पाटोळे यांची मागासवर्गीय अनुशेष भरती,२०११ अंतर्गत जा.क्र/आस्था/१८६३ दि.०३/११/२०१२ अन्वये जळगांव शहर महानगरपालिकेच्या आस्थापना सुचिवरील फिटर या पदावर वेतनश्रेणी रु.५२००-२०२००/- ग्रेड पे रु.१९००/- मध्ये सरळसेवेव्दारे नियुक्ती झालेली असून, ते हल्ली पाणी पुरवठा विभागाकडेस कार्यरत आहेत. तरी त्यांची बदली माढा नगर पंचायत ता.जि.सोलापुर येथे पाणी पुरवठा विभागाकडे अनुसुचित जातीचे फिटर हे पद रिक्त असलेने तसेच माढा नगर पंचायत ठराव क्र.२११ दि.५/३/२०१९ अन्वये जा.क्र./९६२/दि.२/१२/२०१९ च्या मुख्याधिकारी नगरपंचायत माढा यांच्या पत्रानुसार रिक्त पदावरील जागी बदलीने नेमणूक देणेबाबत विनंती केली आहे. श्री.प्रविण विलास पाटोळे यांनी केलेल्या

अर्जाबाबत महाराष्ट्र शासनाने शासन परिपत्रक क्र. SRV-१०९७/प्र.क्र.२०/९७/बारा,दि.२७ नोव्हेंबर,१९९७ अन्वये शासकीय सेवकांच्या नियतकालिक बदल्यासंदर्भात ठरविलेल्या धोरणानुसार विचार करता येईल.

तसेच त्यांचे सेवापुस्तक पाहता त्यांचे विरुद्ध विभागीय चौकशी प्रस्तावित नाही. तसेच त्यांचेकडेस काहीएक बाकी घेणे नाही. व लेखा परिक्षणात त्यांचेबाबत कोणताही आक्षेप नाही. परिपत्रकातील सुधारीत धोरण क्र.०२ नुसार त्यांचा सेवेचा जिल्हयातील कार्यकाळ सुमारे ७ वर्षे झालेला असून क्र. ४ नुसार त्यातील (अ) व (ब) नुसार त्यांनी कळविलेली पसंती,त्यांची प्रशासकीय सोय व वैयक्तिक पसंती विचारांत घेता श्री.प्रविण विलास पाटोळे, फिटर, पाणी पुरवठा विभाग यांची माढा नगरपंचायत, माढा, ता.जि.सोलापुर येथे रिक्त असलेल्या फिटर संवर्गातील पदावरील जागी आंतरजिल्हा बदलीने नेमणूक होणे कामी ना-हरकत प्रमाणपत्र देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६३ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- खडके सुनिल वामनराव**
**अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ७)** जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना **(**वाढीव हद्द**)** मौजे खेडी बु.स.नं.९/४ व ९/५ या जमिनीतुन दर्शविलेले आरक्षण क्र.२१५, डिस्पेन्सरी अण्ड मॅटर्निटी होम ने बाधीत जमिनीचे भुसंपादनाबाबत रक्कम रु.१,९८,४०,०००/- खर्च अपेक्षित असुन संयुक्त मोजणीसाठी येणारा खर्च व प्रस्तावा अंतर्गत वेळोवेळी येणाऱ्या खर्चास व प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी तथा भुसंपादन अधिकारी यांचेकडेस पाठविणे कामी प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** टी.डी.आर. देणेस मान्यता देण्यात यावी.

**श्री.राजेंद्र पाटील :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.२५० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना **(**वाढीव हद्द**)** मौजे खेडी बु.स.नं.९/४ व ९/५ या जमिनीतील दर्शविलेले आरक्षण क्र.२१५, डिस्पेन्सरी अण्ड मॅटर्निटी होम ने बाधीत जमिनीचे भुसंपादनासंबंधी म.प्रा. व न.र.अधिनियमाचे कलम १२७ नुसार खरेदी सुचना जमिन मालक श्री.ज्ञानेश्वर काशिनाथ कोल्हे व इतर यांनी नियोजन प्राधीकरणास दिलेली आहे मात्र महानगरपालिकेची आर्थिक स्थितीचा विचार करता जमिन मालक श्री.ज्ञानेश्वर काशिनाथ कोल्हे व इतर यांना उक्त बाधीत जमिनीचे भुसंपादनासंबंधी महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बघता आर्थिक मोबदला देण्याऐवजी टि.डि.आर. देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६३ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- अड.हाडा शुचिता अतुलसिंह**
**अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ८)** जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना **(**जुनी हद्द**)** जळगांव स.नं.११५/१ब/१अ/१/२/ब/ब व ११५/१ब/१ब/१/१ या जमिनीतुन दर्शविलेला आरक्षण क्र.४५, प्लेग्राऊंड ने बाधीत जमिनीचे भुसंपादनाबाबत रक्कम रु.५,७०,६०,१६०/- खर्च अपेक्षित असुन संयुक्त मोजणीसाठी येणारा खर्च व

प्रस्तावा अंतर्गत वेळोवेळी येणाऱ्या खर्चास व प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी तथा भुसंपादन अधिकारी यांचेकडेस पाठविणे कामी प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** टी.डी.आर. देणेस मान्यता देण्यात यावी.
**श्री.राजेंद्र पाटील :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २५१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (जुनी हद्द) जळगांव स.नं.११५/१ब/१अ/१/२/ब/ब व ११५/१ब/१ब/१/१ या जमिनीतुन दर्शविलेला आरक्षण क्र.४५, प्लेग्राऊंड ने बाधीत जमिनीचे भुसंपादनासंबंधी म.प्रा. व न.र.अधिनियमाचे कलम १२७ नुसार खरेदी सुचना जमिन मालक श्री.प्रकाश बाबुराव चौधरी व इतर यांनी नियोजन प्राधीकरणास दिलेली आहे मात्र महानगरपालिकेची आर्थिक स्थितीचा विचार करता जमिन मालक श्री.प्रकाश बाबुराव चौधरी व इतर यांना उक्त बाधीत जमिनीचे भुसंपादनासंबंधी महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बघता आर्थिक मोबदला देण्याऐवजी टि.डि.आर. देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६३ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- अड.हाडा शुचिता अतुलसिंह**
**अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ९)** महापालिकेच्या जागेवरील विकास दूध बुथ विक्री केंद्रांना सोबतच्या यादीतील केंद्राना मुदतवाढ देण्यास परवानगी मिळणेबाबत कार्यकारी संचालक, जळगांव जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित,जळगांव यांनी दिलेल्या अर्जावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** विषय मान्य आहे.
**श्री.सचिन पाटील :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २५२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव जिल्हा दुध उत्पादक संघ यांनी दिलेल्या यादीनुसार खालील दुध बुथ केद्रांना म.न.पा. ठराव क्र.७३ दि.१९/०१/२०१९ मध्ये नमूद अटी शर्तीनूसार मुदतवाढ देण्यात येत आहे.

**महानगरपालिका जागेवर असलेली विकास दुध केंद्राची यादी**

| अ.नं. | केंद्राचे नाव | केंद्रचालकाचे नाव | पत्ता |
|---|---|---|---|
| १ | ट्रॉफिक गार्डन | श्रीमती आश्लेषा दुर्गादास ठाकुर | ट्राफिक गार्डन जवळ |
| २ | पिंप्राळा गेट | श्री.विशाल अरुण मंडोरे | पिंप्राळा रेल्वे गेट,पिंप्राळा रोड |
| ३ | बालक मंदीर | सौ.इंदू अरुण पाटील | शुरपाटणे बालक मंदीर समोर |
| ४ | रिंग रोड १ | सौ.विजया प्रकाश चव्हाण | जे.डी.सी.सी.बँक गेट जवळ |
| ५ | मित्र नगर | श्री.वैशाली जितेंद्र सरोदे | मित्र नगर ख्वॉजामिया जवळ |
| ६ | गणेश कॉलनी १ | श्री.पंकज प्रकाश वराडे | गणेश कॉलनी रिक्षा स्टॉप शेजारी |
| ७ | श्रीकृष्ण कॉलनी | सौ.संध्या जयवंत निकम | अशोक बेकरीच्या मागे |
| ८ | प्रगती विदया मंदीर | श्री.एकनाथ मांगो पाटील | प्रगती विदया मंदीर शाळे समोर |
| ९ | आय.एम.आर.कॉलेज | श्री.रणजित रामचंद्र काळे | मुलींचे आय.टी.आय.च्या बाजुला |
| १० | शिव कॉलनी १ | श्री.चंद्रकांत पांडुरंग चौधरी | शिव कॉलनी स्टॉप जवळ |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | कोल्हे नगर | श्री.मनोज तुकाराम माळी | कोल्हे नगर १०० फुटी रोड लगत |
| १२ | मानराज पार्क | श्री.देवेंद्र बाबुराव बडगुजर | मानराज शेजारी |
| १३ | गुजराल पेट्रोल पंप | सौ.वंदन किशोर साळंखे | गुजराल पेट्रोल पंपा समोर |
| १४ | पिंप्राळा चौक | श्री.रविंद्र रामकृष्ण बारी | शिवाजी चौक, पिंप्राळा |
| १५ | ओम साई केंद्र | सौ.वर्षा महेंद्र राणा | सिध्द विनायक सिल्क मिल्स,पिंप्राळा रोड |
| १६ | खोटे नगर | सौ.ललिता अनिल सुरळकर | खोटे नगर स्टॉफ |
| १७ | सुरक्षा नगर | श्री.प्रमोद ज्ञानदेव महाजन | सुरक्षा नगर पाण्याच्या टाकी जवळ |
| १८ | हिरा शिवा कॉलनी | श्री.जगदिश भाऊराव पाटील | हिरा शिवा कॉलनी परिसर पाण्याची टाकी |
| १९ | सेवाश्रम | श्री.अनिल शंकर शिंदे | व.वा.वाचनालय,जळगांव |
| २० | नेहरु चौक | श्री.मनिष शांतराम जोगी | नेहरु चौक,जवळ |
| २१ | नवी पेठ | श्री.हेमंत आबाजी निकम | नवी पेठ युनियम बँके जवळ |
| २२ | गोलाणी मार्केट | श्री.राजेश साहेबराव पाटील | गोलाणी मार्केट |
| २३ | विसनजी नगर | श्री.रविंद्र दिनकर असोदेकर | बालगंधर्व नाटयगृह शेजारी |
| २४ | बि.जे.मार्केट | श्री.विजय सिताराम नागला | नविन बि.जे.मार्केट |
| २५ | सिव्हील हॉस्पीटल | सौ.आरती जय ढंढोरे | सिव्हील हॉस्पीटल गेट जवळ |
| २६ | भवानी पेठ | श्री.तुषार सुरेश तारकस | बोहरा मस्जीद जवळ |
| २७ | पोलन पेठ २ | सौ.रुपाली दिलीप चौधरी | दाणा बाजार अन्नदाता हनुमान जवळ |
| २८ | गेंदालाल मिल | शेख गयासोद्दीन शे.चिराकोद्दीन | गेंदालाल मिल मेन रोड लगत |
| २९ | खडके चाळ | सौ.पुजा राजेश जोशी | खडके चाळ, मेन रोड लगत |
| ३० | शिवाजी नगर १ | श्री.पवन विष्णुलाल तिवारी | टि.टि.सांळुखे चौक |
| ३१ | शिवाजी नगर २ | श्री.दिव्येश सुनिल चौधरी | शिवाजी नगर, शाळेजवळ |
| ३२ | जिल्हा परिषद | श्री.प्रेमल बाबुभाई पटेल | जिल्हा परिषद जवळ |
| ३३ | बळीराम पेठ १ | श्री.सुनिल रतनलाल तांबी | बळीराम पेठ चौक |
| ३४ | शनि पेठ ३ | सौ.स्मिता सुधाकर दशपुत्रे | बळीराम मंदीर शनिपेठ |
| ३५ | शनि पेठ २ | श्री.चंद्रशेखर सोनु बारी | शनि मंदीराजवळ |
| ३६ | शास्त्री चौक | सौ.कोकीळाबाई प्रकाश पाटील | शहर पोलिस स्टेशन जवळ |
| ३७ | दायमा शाळा | श्री.भगवान श्रीराम जैतकर | दायमा शाळेजवळ |
| ३८ | सानेगुरुजी | श्री.हरिष प्रल्हाद बडगुजर | सानेगुरुजी रुग्णालया जवळ |
| ३९ | भिलपुरा | श्री.नारायण नामदेव वाणी | भिलपूरा पोलिस स्टेशन जवळ |
| ४० | नटराज | सौ.सुरेखा राजू पाटील | नटराज टाकी समोर |
| ४१ | ओम कॉर्नर | श्री.निवृत्ती भावराव महाजन | गुळवे शाळेजवळ |
| ४२ | लुंकड टॉवर | श्री.मदन तुकाराम महाजन | मोठया पोस्टा समोर |
| ४३ | पांडे चौक | श्री.विजय श्रीराम पवार | मोठया पोस्टा जवळ |
| ४४ | स्वातंत्र चौक | श्री.सुनिल उत्तमराव पाटील | जि.प.अध्यक्ष बंगल्या शेजारी |
| ४५ | पत्रकार कॉलनी | श्री.किरण शामराव भामरे | पत्रकार कॉलनी समोर |
| ४६ | न्यु.बस स्टॅण्ड | सौ.शशिकला भिमराव महाले | न्यु बस स्टॅण्ड समोर |
| ४७ | ढाके कॉलनी | सौ.संगिता कैलास विसपुते | दक्षता नगर शेजारी |
| ४८ | ब्रुकबॉड कॉलनी | श्री.पंडीत बाबुराव पाटील | बहीणाबाई गार्डन जवळ |
| ४९ | बहीणाबाई | श्री.आनंद अमृत बडगुजर | बहीणाबाई उदयानाजवळ |
| ५० | भोईटे शाळा | श्री.देविदास रामचंद्र चौधरी | भोईटे शाळे जवळ |
| ५१ | एम.जे.कॉलेज | सौ.सुनंदा प्रकाश भावसार | एम.जे.कॉलेज कंपाऊंड जवळ |
| ५२ | अस्वाद | श्री.सुभाष चुनिलाल भावसार | एम.जे.कॉलेज जवळ |
| ५३ | एम.जे.कॉलेज रोड | श्री.प्रमोद शांताराम सावदेकर | एम.जे.कॉलेज रोड लगत |

| | | | |
|---|---|---|---|
| ५४ | ऑफिसर क्लब | सौ.मिराबाई राजेंद्र मौर्या | गिरणा पाणी टाकी शेजारी |
| ५५ | निर्मल कॉर्नर | श्री.राजेश मुरलीधर वारके | भुषण कॉलनी रोड,पाण्याच्या टाकीजवळ |
| ५६ | भुषण कॉलनी | सौ.कामेश्वर प्रशांत भंगाळे | अभ्युदय नागरी पतपेढी जवळ |
| ५७ | भगवान नगर | श्री.दिलीप केशव नेमाडे | भगवान नगर |
| ५८ | रामानंद नगर २ | श्री.प्रमोद प्रभाकर धर्माधिकारी | पोलिस चौकी जवळ |
| ५९ | दत्त मंदीर | श्री.प्रसाद पुरुषोत्तम कुलकर्णी | आकाशवाणी दत्त मंदीर जवळ |
| ६० | बॅरीस्टर चौक सागर पार्क | श्री.धनंजय लक्ष्मण पाटील | बॅरीस्टर निकम चौक,सागर पार्क कॉर्नर |
| ६१ | सागर पार्क | श्री.दिलीप जगन तुळसकर | सागर पार्क महाबळ रोड |
| ६२ | आर.टी.ओ.केंद्र | सौ.योगिता दिपक भारोटे | आर.टी.ओ.गेटला लागुन |
| ६३ | ओंकारेश्वर मंदीर | श्री.जयराम तोताराम पाटील | कलेक्टर बंगल्याजवळ |
| ६४ | डि.एस.पी.चौक | श्री.अमित विजय महाजन | डि.एस.पी.चौक परिसर |
| ६५ | मायादेवी कॉर्नर | श्री.विशाल जगन्नाथ पाटील | मायादेवी मंदीर जवळ |
| ६६ | महाबळ कॉलनी | सौ.कविता सतिष पाटील | पिपल्स बँक शेजारी पोलिस चौकी जवळ |
| ६७ | संत गाडगेबाबा चौक | सौ.रेखा अनिल पाटील | गाडगेबाबा चौक |
| ६८ | मुक्तांगण | सौ.मिनाक्षी सतीष महाजन | सामदेव बाबा मंदीराच्या मागे |
| ६९ | गणेश वाडी | श्री.अशोक मदनलाल पांडे | डॉ.भालोदे यांच्या दवाखान्या समोर |
| ७० | जोशी कॉलनी | श्री.ज्ञानेश्वर काशिनाथ खंबायते | पाण्याच्या टाकी जवळ |
| ७१ | वालेचा मार्केट | श्री.सागर बंकटराव पाटील | सिंधी कॉलनी, अमृतकर किराणा जवळ |
| ७२ | सिंधी कॉलनी | सौ.बेबीबाई हंबीरराव देशमुख | सिंधी कॉलनी चौक |
| ७३ | शिरसोली नाका | अब्दुल सत्तार अ.रहेमान पटेल | शिरसोली नाक्या डि.मार्ट समोर |
| ७४ | आदर्शनगर (प्रिन्स मिल्क) | श्री.पंडीत भोमा सपकाळे | आदर्शनगर मोहाडी रोड पेट्रोल पंपाजवळ |
| ७५ | आनंद नगर | सौ.सिमा हसमुख सुर्यवंशी | आनंद नगर मोहाडी रोड लगत |
| ७६ | नेरी नाका | श्री.किरण विठ्ठल पाटील | अण्णाभाऊ साठे पुतळयाजवळ |
| ७७ | ट्रान्सपोर्ट नगर | श्री.राजेश रावण पाटील | झुणका भाकर केंद्राजवळ |
| ७८ | कालिंका माता मंदीर | श्री.संजय देवराम पाटील | कालिंका मंदीर,जुना नशिराबाद रोड |
| ७९ | अजिंठा चौफुली | श्री.विजयकुमार शंकरलाल मालपाणी | अजिंठा चौफुली सुझुकी शोरुम समोर |
| ८० | एम.आय.डी.सी. | सौ.मिनाक्षी सुभाष पाटील | के.के.कॅन शेजारी |
| ८१ | म्हाडा कॉलनी | श्री.अनिल राजमल कासट | राका फर्निचर जवळ |
| ८२ | भारत पेट्रोलियम | श्री.दिलीप संतोष जगताप | गुरांच्या बाजारा जवळ |
| ८३ | अक्सा नगर | शेख निसार शेख युसूफ कुरेशी | मनपा मुलतानी दवाखान्याजवळ अक्सानगर |
| ८४ | रामेश्वर कॉलनी १ | सौ.विदयाबाई देविदास सुर्यवंशी | रामेश्वर कॉलनी,श्रीराम हायस्कूल शेजारी |
| ८५ | महादेव मंदीर | श्री.प्रमोद प्रकाश सानप | महादेव मंदीराजवळ मेहरुण |
| ८६ | अथर्व दुध केंद्र | श्री.प्रमोद वसंतराव मोराणकर | एकलव्य क्रिडा संकुल एम.जे.कॉलेज मागील बाजु |
| ८७ | उत्तुंग कॉर्नर | सौ.शालीनी सुभाष सोनवणे | जुना निमखेडी रोड हायवे दर्शन कॉलनी रोड |
| ८८ | मायमाऊली मिल्क कॉर्नर | श्री.पृथ्वीराज आत्माराम सोनवणे | हॉटेल रॉयल पॅलेस समोर,महाबळ रोड जळगांव |
| ८९ | खेडी बुद्रुक | सौ.संगिता किरण कदम | खेडी बुद्रुक |
| ९० | एम.जे.कॉलेज मागे | श्री.प्रमोद वसंतराव मोराणकर | एम.जे.कॉलेज मागील बाजुस |
| ९१ | आसोदारोड | श्री.सुकदेव ढेकू इंगळे | आसोदारोड मनपा आरक्षण जागेस लागुन |
| ९२ | हायवे दर्शन कॉलनी | सौ.शालीनी सुभाष सोनवणे | हायवे दर्शन कॉलनी जुना निमखेडी रोड |
| ९३ | खुबचंद पेट्रोल पंपा मागे | श्री.हितेश बाबुराव हिंगणे | खुबचंद पेट्रोल पंपाच्या मागे ओपनस्पेला लागुन |

**<u>अटी-शर्ती :.</u>**

१) दुध बुथ केंद्रामध्ये दुध व दुधजन्य प्रदार्थ, बिस्कीट,खारी, टोस्ट व पाणी बोटल विक्रीस ठेवता येतील त्या व्यतिरिक्त तंबाखू, गुटका, सिगारेट इतर पदार्थ आढळल्यास मुदतवाढ रद्द करण्यात येईल.

२) दुध बुथ केंद्रधारकाने दुध बुथ केंद्रापासुन कोणत्याही प्रकारे रहदारीस अडचण निर्माण होणार नाही या बाबतचे प्रमाणपत्र शहर वाहतुक विभागाकडून प्राप्त करुन म.न.पा.कडेस देणे बंधनकारक राहिल.

३) सदर यादीत नमुद केलेल्या दुधबुथ केंद्रास दि.०१/०१/२०२० ते दि.३१/१२/२०२२ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात येत आहे.

वरील अटी शर्तीची पुर्तता करुनच सदर दुध बुथ केंद्रांना मुदतवाढ देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमानुसार कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६३ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**
**अनुमोदक :- पाटील सचिन भिमराव**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १०)** महासभा ठराव क्रं.८९० दि.२३/०३/२०१८ अन्वये पिंप्राळा शिवार गट नं.२१४/१ ही जागा गुलशन ए मिरॉ फाऊंडेशन, जळगांव यांना देणेबाबत पारित झालेल्या ठरावात पिंप्राळा शिवार गट नं.२१४/२ अशी दुरुस्ती करुन मिळणेबाबत सन्मा.सदस्य श्री.सुरेश माणिक सोनवणे यांनी दिलेल्या अर्जावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.सुरेश सोनवणे :-** विषय मान्य आहे.

**सौ.हसिनाबी शेख :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २५३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महासभा ठराव क्रं.८९० दि.२३/०३/२०१८ अन्वये पिंप्राळा शिवार गट नं.२१४/१ ही जागा गुलशन ए मिरॉ फाऊंडेशन, जळगांव यांना देणेबाबत पारित झालेल्या ठरावात पिंप्राळा शिवार गट नं.२१४/२ अशी दुरुस्ती करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. मात्र तत्पुर्वी सदर जागा इतर कोणास देण्यात आलेली नाही याबाबत प्रशासनाने खात्री करुन घ्यावी.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६३ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- सोनवणे सुरेश माणिक**
**अनुमोदक :- शेख हसिनाबी शरीफ**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ११)** महाराष्ट्र राज्याचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचे नांव दिलेल्या सर्व ठिकाणी महारांजाचे नावापुढे “ छत्रपती ” हि उपाधी लावण्याचे दुरुस्ती पत्रक काढणे व त्याबाबत महासभेत ठराव पारित करणेबाबत सौ.अश्विनी विनोद देशमुख, जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी अर्बन सेल जळगांव व इतर पदाधिकारी यांनी दिलेल्या अर्जावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** विषय मान्य आहे.

**श्री.सचिन पाटील :-** माझे अनुमोदन आहे. प्रस्तावानुसार सौ.अश्विनी देशमुख यांनी जे काही ठिकठिकाणी शिवाजी महाराज म्हणुन आपण उल्लेख करतो त्या अनुषंगाने छत्रपती नावाचा उल्लेख करावा आपले भारतीय जनता पार्टीत आणि शिवसेनेत सुध्दा छत्रपती शिवाजी महाराजांच दैवत आहे. त्यानुसार अजुन एक गोष्ट आपल्या निर्दशनास आणायची आहे की आपल्या महापालिकेतले काही दालन जे आहे. त्या दालनांमध्ये महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार जी.आर.नुसार जे जे थोर पुरुष आहे जे वेगवेगळे घटक आहे त्यांचे फोटो फ्रेम लावावे. सचिन पाटलाने भेट दिल अशी फ्रेम लावणे उचित नाही.

आणि या सभागृहामध्ये देखील मी सर्व नगरसेवकांना व सभासदांना मी विनंती करेल. आपण एक छत्रपती शिवाजी महाराजांच तैलचित्र येथे लावावं. अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

**श्री.कैलास सोनवणे :-** साहेब तुम्ही अर्थ समजुन घ्या. हे जे दालन आहेत सर्व या ठिकाणी ही जी लोक आहे आम्हाला खुप आदरणीय आहे. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, सरदार वल्लभभाई पटेल, महर्षि वाल्मीकि हे सगळे आमच्या मनात आहे. परतु काय होत आहे, मागे वाद पण झाला होता. जितेंद्र मराठेंसोबत काही कारण नसतांना. कोणीही मराठा समाजाचा सभापती झाला तर कोणीही तरी शिवाजी महाराजांचा फोटो तेथे लावुन देतात त्यांच नांव टाकुन देतात. कोणीही दलित समाजाचा झाला तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरची प्रतिमा देतात.कोळी झाला तर महार्षि वाल्मीकीची प्रतिमा देतात. लेवापाटील झाला तर सरदार वल्लभभाई पटेलची अशी सर्व राष्ट्रीय पुरुष यांनी वाटुन घेतलेले आहे. हे कोणत्याही एक समाजाची नाही सर्वाचीच आहे. अस सांगण्यात येत की, त्या प्रतिमा काढा, आम्हाला शिवाजी महाराज किंवा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा नाही काढायचे आहे ते नाव काढायचे आहे. ते लोकांनी येऊन एका नगरसेवकाने नंतर येऊन यांच्याशी भांडण ही केले. तर ह्या प्रथा होतात. तर या प्रतिमा काढा आणि महाराष्ट्र शासनाचे जे नियम आहे ज्या साईज मध्ये ते फोटो पाहिजे ते फोटो लावा. आणि ज्या ज्या ऑफिसला ते अत्यावश्यक आहे ते लावा. प्रशासनाने याच्यावर तात्काळ कार्यवाही करावी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.२५४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र राज्याचे आराध्य दैवत जगातील एकमेव राजा ज्यांच्या नावापुढे छत्रपती हि उपाधी लावली आहे. " छत्रपती शिवाजी महाराज" हे १७ व्या शतकातील आंतरराष्ट्रीय कीर्तीचे जगात तुलना नाही असे राजे होते.

जगातील ११२ राष्ट्र छत्रपती शिवाजी महाराजांच्या गोरिला (युध्दतंत्र) चा वापर आपल्या अभ्यास क्रमात करतात. महाराजांचे प्रेमापोटी लोक बऱ्याच संस्थांना, बगीच्यांना, रस्त्यांना मोठमोठया ओव्हर ब्रिजला महाराजांचे नाव देतात. परंतु प्रशासन व नागरिक यांच्या अनावधानात महाराजांच्या नावापुढे " छत्रपती" उपाधी लावली जात नाही. करीता महाराजांचे नाव असलेल्या सर्व ठिकाणी " छत्रपती" हि उपाधी लावण्याचे दुरुस्ती पत्रक काढणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.
**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६३ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- पाटील कुलभूषण विरभान**
**अनुमोदक :- पाटील सचिन भिमराव**

**नगरसचिव :- जादा विषय क्रं:- १)** महानगरपालिका प्रांगणात लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा अर्धकृती पुतळा ऐवजी पुर्णाकृती पुतळा बसविणेबाबत सन्मा.सदस्य श्री.सुनिल वामनराव खडके व इतर यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.सुनिल खडके :-** म.न.पा. प्रांगणात लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा अर्धकृती पुतळा मंजुर केलेला आहे. परंतु तो पुर्ण पुतळा मंजुर करावा, म्हणुन आम्ही अर्ज ही केलेला आहे. बहुतेक नगरसेवकांच्या सह्या ही घेतलेल्या आहे. सुनिल भाऊ महाजन कडे ही पाठविलेल होत. विष्णु भाऊंकडे ही सही घ्यायला पाठविल होत. परंतु ते दोन्ही मुंबईला गेलेले होते. वहिणींची सही घेतलेली आहे सुनिल भाऊ. तर हा विषय मान्य आहे.

**श्री.सचिन पाटील :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांनी देशासाठी खुप मोठ योगदान दिलेल आहे. त्यांचा आधी सुध्दा ठराव झालेला आहे. याच्या आधी जो ठराव झालेला आहे तो ही योग्य आहे. आता हा जो ठराव दिलेला आहे त्या प्रमाणे पुर्ण पुतळयाची गोष्ट केलेली आहे. या पुतळयाची उभारणी लवकरात लवकर व्हावी. आणि एक चौकामध्ये सुध्दा एक पुर्ण पुतळा लावावा. हा ठराव सन २०१२-१३ मध्ये झाला होता. तर त्याच ही आपण अवगत कराव आणि त्या चौकाला तेथे पुतळा कसा उभारता येईल त्यांच नियोजन व्हावं. अशी मी सर्व सभागृहातर्फे मी विनंती करतो. आणि सुनिल भाऊंनी जो पुर्ण पुतळा बसविण्याचा जो प्रस्ताव दिलेला आहे तो लवकरात लवकर करण्यात यावा.

**श्री.इब्राहीम पटेल :-** आता सुनिलभाऊंची सही घेतली तसेच विष्णुंभाऊंची नाही पाठविले होते घरी (सौ.जयश्री महाजन) वहिनींची सही घेतली, नेत्यांना जातीमध्ये न वाटता ते पुर्ण भारताचे आहेत. व तुम्ही आम्हालाही सांगीतले असते तर आम्हीही सह्या केल्या असत्या , कमीत कमी आपण थोर पुरुषांना जातीमध्ये वाटु नये .

**श्री.सुनिल खडके :-** मी सांगतो तुम्हाला ज्या दिवशी हे ठरले.

**श्री.सुनिल महाजन :-** ही भाजपची सिस्टिमच आहे की समाजामध्ये जाती फोड करायची आणि त्याहिशोबानेच हा ठराव मांडलेला आहे.

**श्री.सुनिल खडके :-** भाऊ हे चुकीचे बोलता आहेत तुम्ही ज्या दिवशी आम्ही सह्या घेतल्या त्या दिवशी तुम्ही घरी नव्हते आणि आम्ही सर्वांच्या सह्या घेतल्या आहेत .

**मा.महापौर :-** सर्वांनी खाली बसुन घ्यायचे आहे. नितीन भाऊ खाली बसुन घ्या.

**श्री.सुनिल खडके :-** भाऊ तुम्ही आतापर्यंत करून घ्यायला पाहीजे होते आता पर्यंत तुम्ही का नाही करुन घेतला हा विषय.

**श्री.विष्णु भंगाळे :-** मागच्या वेळेस जर ठराव मंजुर झाला होता तर मग आता पुन्हा आणायची गरज काय होती व सभागृहाच्या आता लक्षात आणुन द्यायचे याचाही छडा सभागृहाने लावावा.

**श्री.सुनिल खडके :-** भाऊ पहिला ठराव जो होता तो अर्धाकृती चा होता आता जो मांडला आहे तो पुर्णाकृती चा आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सुनिल भाऊ काय आहे की सुनिल भाऊंचा बोलण्याचा उद्देश्य हा वेगळा आहे .

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मा.महापौर साहेबा सुनिल भाऊ , दोघे सुनिल भाऊ आणि हे सभागृह प्रस्ताव घेणे ही औपचारीकता आहे पण ठराव हा सर्व समाज मिळुनच आपण करतोय पण ज्यावेळेला विषय घ्यायचा असला त्यावेळेला कोणी असले नसले सही घ्यायचा विषय असतो अजेंडा निघालेला असतो अश्यावेळेस असा एखादा प्रस्ताव घ्यावा लागतो .

सभागृहात गोंधळ निर्माण झाला होता.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** सर्वानमुते ठराव मंजुर करावा .

**श्री.सुनिल महाजन :-** मंजुर करावा .

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर साहेब ठराव मंजुर करण्यात यावा परंतु ठरावास आमचा कोणाचाच विरोध नाहीये , महापौर ताई ठराव मंजुर केलेला आहे ठरावाबद्दल कोणाला काही आक्षेप नाही परंतु मा.सुनिल भाऊ खडकेंनी प्रश्न उपस्थित केला आहे की यांच्या घरी (श्री.सुनिल महाजन) पाठविलेले होते परंतु ते उपलब्ध नव्हते . फक्त एकट्या सुनिलभाऊ खडकेंच्या नावाचा जरी प्रस्ताव आला असता तर तो सुध्दा या सभागृहाने सर्वानुमते मान्य केला असता . सुनिलभाऊंचा आक्षेप हाच आहे की एखाद्या मोठया थोर पुरूषाला अश्या पध्दतीने जातीचे शिक्के लावु नका हा सुनिल भाऊंचा आक्षेप आहे याच्यामध्ये सुनिलभाऊ काही वेगळं बोलले असे काही नाहीये किंवा सभागृहामध्ये कुणाचा अपमान करायचा असेही नाहीये . जे थोर पुरूष आहेत त्या थोर पुरूषांच्या बाबतीत या सभागृहातील सर्वांना आदर हा समान आहे आणि अश्या पध्दतीने यांच्या सह्या राहुन गेल्या आणि त्यांच्या सह्या राहुन गेल्या हा विषय या सभागृहाला अपेक्षित नाहीये.

**श्री.सुनिल खडके :-** भाऊ त्यांनी फोन करून आम्हाला विचारले की आमच्या सह्या घेतल्या नाही म्हणुन मी खुलासा केला, रात्री मला सांगीतले सुनिल भाऊंनी की माझी सही का नाही घेतली, म्हणुन मी आता त्यांना खुलासा करून सांगीतले .

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब सुनिल भाऊंनी विनाकारण भाजपाला ह्या भानगडीत ओढले आहे .

**श्री.सुनिल महाजन :-** विनाकारण नाही .

**श्री.कैलास सोनवणे :-** खुलासा करतोय ना मी आता सरदार वल्लभाई पटेल हे भारतीय जनता पक्षाचे आदर्श आहेत .

**श्री.सुनिल महाजन :-** नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** मी बोलतोय.

**श्री.सुनिल महाजन :-** नाही ते सर्वांचे आदर्श आहेत.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** त्यावेळेला बीजेपी नव्हती आप्पा.

**श्री.कैलास सोनवणे :-** ईबाभाई बाकीचे जे आहेत ना ते आता नारळ फोडताय त्यांच्या नावाने पहिल्यापासुन फक्त भारतीय जनता पक्षाचेच नारळ फुटताय त्यांच्या नावाने , पहिल्यापासुन सुरूवातीपासुन आणि तुम्ही त्याच्यामध्ये असे का पाहता की त्याच्यामध्ये फक्त लेवा पाटीलांचीच सही आहे याच्यात ती भारतीय जनता पक्ष आणि शिवसेनेच्या नगरसेवकांची सही

आहे ती, तुम्ही लेवा पाटील आहे म्हणुन घेतली नाहीये तुमची सही तुम्ही विरोधीपक्ष नेते आहेत म्हणुन घेतली आहे तुमची सही आणि भारतीय जनता पक्षाचे याच्यावर लेवापाटलांची सही येईल का ? लेवापाटीलांच्या व्यतिरीक्त दुसऱ्यांच्या सह्या आहेत त्याच्यावर दाखवु का तुम्हाला , शुचिताताई हाडांची सही आहे त्याच्यावर.

**मा.महापौर :-** सर्वांनी खाली बसुन घ्यायचे आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** याच्यामध्ये नाहीये सही त्यांची . .

**श्री.कैलास सोनवणे :-** आहे भाऊ त्यांची सही

**श्री.नितीन लढ्ढा :-** थांबा आप्पा मी वाचुन दाखवतो नाहीये त्यांची सहया कुणकुणच्या आहेत ते . .

**श्री.कैलास सोनवणे :-** अहो भाऊ राहु द्या

**श्री.नितीन लढ्ढा :-** सुनिल वामनराव खडके , उज्वला मोहन बेंडाळे , सुनिल सुपडु महाजन , ललीत विजयराव कोल्हे , सिंधु विजयराव कोल्हे गायत्री इंद्रजित राणे, दिपमाला मनोज काळे , अमित पांडुरंग काळे, नितीन मनोहर बरडे, विष्णु रामदास भंगाळे, प्रविण रामदास कोल्हे, विश्वनाथ सुरेश खडके, जयश्री सुनिल महाजन.

**श्री.कैलास सोनवणे :-** अहो भाऊ माझ्याकडेपण यादी आहेना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** रेश्मा कुंदन काळे , मिनाक्षी गोकुळ पाटील , रेखा चुडामण पाटील काय आहे आप्पा हे

सभागृहात गोंधळ निर्माण झाला .

**श्री.कैलास सोनवणे :-** शुचिता ताईंचीपण सही आहे भाऊ . . .

**श्री.नितीन लढ्ढा :-** हे काय आप्पा आपल्यासमोर आहे.

**ॲड . शुचिता हाडा :-** माझी सुध्दा सही आहे त्या प्रस्तावावर .

**मा.महापौर :-** सर्वांनी खाली बसावे.

**ॲड. सौ.शुचिता हाडा :-** नगरसचिव साहेबांकडे जे ओरीजीनल डॉकेट आहे त्याच्या मध्ये जयश्री सुनिल महाजन यांच्या नावाखाली माझी सही सुध्दा आहे.

सभागृहात गोंधळ निर्माण झाला .

**ॲड . शुचिता हाडा :-** प्रस्ताव ज्यावेळी तयार झाला आहे. नितीन भाऊ आपण विनाकारण विषयाला वेगळं वळण देतोय आणि विनाकारण वाद घालतोय, महापुरूषांचे ठराव होताहेत किंवा जे काही होताहेत ते सर्वानुमते व शांततेच्या मार्गाने व्हावे अशी सर्वांना विनंती आहे. हा विषय जातीवाद कडे कुणीही वळवु नका सर्वानुमते ठराव आपण केलेला आहे. सभागृहाचा यामध्ये निष्कारण वेळ घालवणे हा काही मुद्दा नाहीये आपण पुढच्या विषयाकडे जावु.

**श्री.जितेंद्र मराठे :-** मा.महापौर ताई व सर्व सन्मा.सभागृह या सभागृहामध्ये नव्याने निवडुन आलेले जवळजवळ आम्ही ३०-४० जण आहेत म्हणजे आमच्या पुर्वीपासुन ही जुनी पिढी ही या ठिकाणी बसलेली आहे . हा जो प्रस्ताव आहे सरदार वल्लभभाई पटेल यांचा अर्धाकृती पुतळा किंवा पुर्णाकृती पुतळा उभारावा यासाठी या प्रशासकीय इमारतीला सरदार वल्लभभाई पटेल याला कधीपासुन नांव लागलेले आहे याची माहिती जुने जेवढेपण सदस्य असतील यांनी माहिती द्यावी व यांना माहिती असेल, मला सांगा कधीपासुन झालेली आहे .

**श्री.कैलास सोनवणे :-** २००३ पासुन

**श्री.जितेंद्र मराठे :-** २००३ पासुन झालेली आहे .

**श्री.सुनिल महाजन :-** २००१ पासुन झाली आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** २००१ पासुन आपण या इमारतीला नांव दिलेले आहे , त्याच्यानंतर मला सांगा महापालिकेला नांव देवुन आपण काय मोकळे झाले का ? मी ज्यावेळेला सभापती होते त्यावेळेला मी त्याठिकाणी बसलो मी सर्वात प्रथम सरदार वल्लभभाई पटेल हे नांव महापालिकेच्या प्रत्येक पत्रावर सरदार वल्लभभाई पटेल यांच्या नावाचा उल्लेख झाला पाहीजे तसेच इमारतीचा उल्लेख झाला पाहीजे . हे सर्वांनाच अनभिज्ञ होते कोणालाच माहिती नाही . मला कोणत्या ज्येष्ठ नेत्याला बोलायचे नाहीये , कोणत्याही वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनाही बोलायचे नाहीये . सांगायचे एकच आहे कोणी एखाद्याने जेव्हा सांगीतले की आपल्याला जाग येते मी तर नविनच होतो . २००१ मध्ये तर माझा संबंधपण नव्हता , मी आपले बाळु भामरे यांच्याकडुन माहिती घेतली . मी ज्यावेळेला सभापती झालो त्याच्या दोन महिन्यापर्यंत कोणालाच माहिती नाही की

नांव लागलेले होते. तसे पाहायला गेले तर आपण कुठल्या विषयाचा गाजावाजा करावा , ओहापोह करावा हे आपल्यावर आहे. आपण कोणत्या समाजाला दुखवावं कुठल्या समाजाला दुखवु नये हे आपल्यावर आहे . म्हणुन एखादी व्यक्ती आली आणि त्याने दुसरे कागद आणले आणि आपल्याला सांगायचे की या ठिकाणी आपल्याला असे असे करायचे होते . सगळयांनाच सन्मान आहे महापौर साहेबा म्हणुन सर्वांना विनंती आहे की कोणत्याही समाजावर किंवा याच्यावर द्वेष निर्माण करू नका . सभागृहामध्ये सगळया समाजाचे लोक आहेत म्हणुन येथील विषय तुम्ही वेगळया स्वरूपाचा बाहेर काढु नका एवढी सर्वांना , सभागृहाला विनंती आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** अध्यक्ष महोदया , माजी सभापती जितुभाऊ मराठे यांनी आता विषय मांडला की स्थायी समिती सभापती झाल्यापासुन प्रत्येक याच्यावर नांव लावले जाते. आजच अजेंडा १५ तारखेचा मिळालेला आहे त्याच्यावर सुध्दा नांव नाही सरदार वल्लभभाई पटेल, प्रशासकीय इमारत असे.

श्री.नितीन बरडे :- त्यावेळेस होते भाऊ .

**श्री.विष्णु भंगाळे :-** होय मग तेव्हापासुन ते कंम्पलसरी लागलचं पाहीजे हे प्रशासनाला आपण कळवावे की याच्यापुढे सुध्दा चुकता कामा नये. आता १५ तारखेची जी स्टँडींग ची मिटींग आहे त्या अजेंडयावर सरदार वल्लभभाई पटेल असे इमारतीचे नांव टाकलेले नाही. फक्त म्हटलेले आहे की शनिवार सकाळी ११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात आयोजित करण्यात आलेली आहे . या गोष्टीची सुध्दा त्यांनी दखल घ्यावी आणि याच्यापुढे अशी चुक होणार नाही याची सुध्दा काळजी घ्यावी.

**नगरसचिव :-** सर्वानुमते मंजुर आहे का ? रियाजभाई मंजुर आहे का ?

**श्री.रियाज बागवान :-** हो मंजुर आहे.

**नगरसचिव :-** मा.महापौर महोदया यांचेकडुन महासभेच्या पटलावर आयत्या वेळेचे विषय घेणेबाबत निर्देश झालेले आहेत. त्यानुसार तसे ४ प्रस्ताव पुढील प्रमाणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.२५५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महासभा ठराव क्रं.६३ दि.०७/१२/२०१८ अन्वये जळगांव शहर महानगरपालिका प्रांगणात लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा अर्धकृती पुतळा बसविणेबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. मात्र सदर स्थळी लोहपुरुष सरदार वल्लभाई पटेल यांचा अर्धकृती पुतळा ऐवजी पुर्णाकृती पुतळा बसविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६३ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- खडके सुनिल वामनराव**
**अनुमोदक :- पाटील सचिन भिमराव**

**नगरसचिव :- जादा विषय क्रं:- २)** प्र.क्र.१५ मेहरुण परिसरातील स्व.लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे चौकात पुलाजवळ प्रवेशव्दार बांधणे कामी परवानगी तसेच ना-हरकत मिळणेबाबत सन्मा.सदस्य श्री.प्रशांत सुरेश नाईक यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** विषय मान्य आहे.

**श्री.किशोर बाविस्कर :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २५६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्र.क्र.१५ मेहरुण परिसरात स्व.लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे चौक स्थित असून सदर चौकात समस्त लाडवंजारी समाज श्रीराम मंदीर संस्थान मेहरुण तर्फे वरील चौकात पुलाजवळ वाहतुकीस तसेच रहदारीस अडथळा निर्माण न करता स्व:खर्चाने प्रवेशव्दाराचे बांधकाम करुन समस्त लाडवंजारी समाज श्रीराम मंदीर संस्थान मेहरुण संचलित स्व.लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे नाव लिखीत करुन

प्रसिध्द करणेचा मानस सदर समस्त लाडवंजारी समाज श्रीराम मंदीर संस्थान मेहरुणचा आहे. करीता प्र.क्र.१५ मेहरुण परिसरातील स्व.लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे चौकात पुलाजवळ प्रवेशव्दार बांधणे कामी समस्त लाडवंजारी समाज श्रीराम मंदीर संस्थान मेहरुण यांना परवानगी तसेच ना-हरकत देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने प्रत्यक्ष स्थळ परिक्षण करुन रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घेऊन आवश्यक त्या अटी-शर्तीनुसार व नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६३ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश**

**नगरसचिव :- जादा विषय क्रं:- ३)** प्र.क्र.१९ सुप्रिम कॉलनी सर्व्हे क्रमांक १८७/२क मधिल भागास “नशेमन कॉलनी” असे नामकरण करणे कामी महानगरपालिकेची परवानगी मिळणे व ना-हकरत मिळणेबाबत सन्मा.सदस्य श्री.प्रशांत सुरेश नाईक यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.सचिन पाटील :-** विषय मान्य आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २५७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्र.क्र.१९ सुप्रिम कॉलनी सर्व्हे क्रमांक १८७/२क मधिल भागास “नशेमन कॉलनी” असे नामकरण करणे कामी महानगरपालिकेची परवानगी मिळणे व ना-हकरत मिळणेबाबत प्र.क्र.१९ सर्व्हे क्रमांक १८७/२क मधिल समस्त नागरीकांनी केलेल्या मागणीनुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर परिसरास यापुर्वी कोणाचेही नांव दिले गेले नसलेबाबत खात्री करुन नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६३ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील सचिन भिमराव**

**अनुमोदक :- नाईक प्रशांत सुरेश**

**नगरसचिव :- जादा विषय क्रं:- ४)** आजी माजी सैनिक व अर्धसैनिक दलातील सैनिकांच्या पत्नीच्या नावे असलेल्या मिळकतींवर मालमत्ता करात सुट मिळणेबाबत सन्मा.सदस्य डॉ.श्री.चंद्रशेखर शिवाजीराव पाटील यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** विषय मान्य आहे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २५८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१६/प्र.क्र.५९/नवि २० दि.०५/०४/२०१६ नुसार संरक्षण दलातील आजी, माजी, शौर्य पदक धारक सैनिकांच्या तसेच दिव्यगंत सैनिकांच्या विधवांना मालमत्ता करात सुट देणे बाबत महाराष्ट्र शासनाने निर्णय घेतलेला आहे. व त्याची अंमलबजावणी संपूर्ण महाराष्ट्रातील महानगरपालिका मध्ये सुरु आहे. त्याच अनुषगांने जळगांव शहर महानगरपालिकेने महासभा ठराव क्र.७५८ दि.२६/०९/२०१७, महासभा ठराव क्र.७८२ दि.१६/११/२०१७ व महासभा ठराव क्र.१३४ दि.०५/०३/२०१९ दलातील

सैनिक हे आपल्या राहत्या गावापासून लांब देशाच्या सरहद्दीवर सेवा बजावत असतात. कुटूंबाला रहावयासाठी मिळकत विकत घेतांना विविध कागदावर सहया करणे, खरेदी खत करणे, नकाशे तयार करुन मंजूरी घेणे, कर्ज प्रकरण तयार करणे, बँकेत जमा करणे या कामासाठी वेळोवेळी सहयांची आवश्यकता लागते. तथापी सैनिकांना वेळोवेळी सुटी मिळू शकत नाही करीता सैनिकांनी आपल्या सोयीसाठी पत्नीच्या नावे मिळकत खरेदी केलेल्या आहेत. मात्र महापालिका सदर मिळकतींवर मालमत्ता करात सुट देत नाही. करीता महासभा ठराव क्र.७५८ दि.२६/०९/२०१७, महासभा ठराव क्र.७८२ दि.१६/११/२०१७ व महासभा ठराव क्र.१३४ दि.०५/०३/२०१९ प्रमाणे आजी माजी सैनिक व अर्धसैनिक दलातील सैनिक यांना मालमत्ता करात सुट देणेत येते. त्याच प्रमाणे सदर आजी / माजी सैनिक व अर्ध सैनिक दलातील कर्मचारी यांच्या पत्नीच्या नावे असलेल्या मिळकतींमध्ये ते स्वत: वास्तव्य करीत असल्यास त्या मिळकतींवरील मालमत्ता करात सुट देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. मात्र त्यांनी त्यांच्या भाडयाने दिलेल्या व वाणिज्य वापरासाठीच्या मिळकतींवर अशाप्रकारे मालमत्ता करात सुट देण्यात येऊ नये.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६३ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील चंद्रशेखर शिवाजी**

**अनुमोदक :- ढेकळे सदाशिव गणपत**

**नगरसचिव :-** मा.महापौर महोदया, यांचेकडुन आयत्यावेळेच्या चार विषय पटलावर आलेले आहे. त्यानुसार सदरचे चार प्रस्ताव पुढील प्रमाणे.

**श्री.सचिन पाटील :-** महापौर महोदया १८७/२ क चा विषय आहे , माझे संमित्र प्रशांत भाऊंनी मांडलेला आहे की नशेमन कॉलनी असे नामकरण करणेकामी आम्हाला ज्या गोष्टींचं ज्ञान नसेल माहिती नसेल त्या आम्ही आमच्या संमित्रांकडुन जाणुन घेवु समजुन घेवु .

**श्री.प्रशांत नाईक :-** आमचे मित्र प्रा.सचिन भाऊ तुम्हाला नशेमनचा अर्थ माहिती नसेल का तो ऊर्दु माध्यमाचे जे प्राध्यापक असतील त्यांना विचारा याचा की याचा अर्थ काय होतो भाऊ आपण प्राध्यापक आहात आणि हा नशेमन जो शब्द आहे तो ऊर्दु शब्द आहे याचा जो अर्थ आहे घोसला आणि आशियाना याला नशेमन म्हणतात .

**श्री.सचिन पाटील :-** प्रशांत भाऊंनी जे मांडले ते आम्हाला मान्य आहे .

**श्री.प्रशांत नाईक :-** भाऊ, लताजी यांनी गान ही म्हटलेले आहे, आपने ही गिराते है नशेमन पे बिजलीयां गैरोने आके फिर भी हमे थाम लिया है.

**श्री.सचिन पाटील :-** भाऊ आम्ही याच्यासाठी विचारले की आम्हाला माहिती होईल.

**श्री.अनंत जोशी :-** नशेमन चा जो अर्थ आहे मला असे वाटते की सचिन भाऊ हे प्राध्यापक असल्यामुळे त्यांना थोडाफार अभ्यास असला पाहीजे हा शब्द ऊर्दु आहे म्हणुन त्यांना माहित नसेल पण जर तुम्हाला खरचं ऊर्दुची आवड आहे तर तुम्ही गुलजार ऐकत जा खुपचं छान आहे .

**श्री.सचिन पाटील :-** भाऊ नक्की मी ऐकतो पण मी इंजिनियरींगचा प्राध्यापक आहे.

**श्री.अनंत जोशी :-** तसे नाही आहे भाऊ मी ऐकत असतो सचिन भाऊ तुम्हीही ऐका आणि तुम्हाला जर त्रास होत असेल तर तुम्ही गुलजारचे गाणे ऐका, तसे सिनेमाची आवड असलेले येथे दोन लोकं आहे एक आहे कैलास आप्पा आणि दुसरं आहे मी, जे आठवडयातुन दोन ते तीन दिवस तुम्हाला पिक्चर बघायला गेलेले दिसतील

**श्री.सचिन पाटील :-** त्यासाठीच मी माहिती घेत होतो .

**श्री.अनंत जोशी :-** त्याच्याकरीता कैलास आप्पांकडुन माहिती घेतली असती कारण की सिनेमाचा अनुभव त्यांचा आणि माझा खुप आहे आप्पा पुढच्या वेळेस जातांना यांना आपल्या बरोबर घ्या.

**नगरसचिव :-** मा.महापौर महोदया यांचेकडुन महासभेच्या पटलावर आयत्या वेळेचे ४ विषय घेणेबाबत निर्देश झालेले आहेत. त्यानुसार ४ प्रस्ताव पुढील प्रमाणे.

**नगरसचिव :- आयत्यावेळेचा विषय क्रं:- १)** नागरी दलित्तेतर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत नागरी सुविधांचा विकास कामांचे एकूण १६ कामांचे प्रस्ताव तयार करुन शासनाकडे सादर करणे कामी मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य श्री.नवनाथ दारकुंडे यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** विषय मान्य आहे.

**श्री.किशोर बाविस्कर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** साहेब चारही विषय मंजुर करण्यात यावे .

**नगरसचिव :-** रियाज भाई आयत्यावेळेचे विषय मंजुर आहेत का ?

**श्री.रियाज बागवान :-** होय मंजुर आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** कुलभुषण पाटील यांचा एक विषय आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** याच्यामध्ये आपल्या आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये दलित वस्ती चा जो २ कोटी चा निधी प्राप्त झालेला होता त्याच्यामध्ये आपण जे दलित वस्तीचे जे वॉर्ड आहेत त्यांच्यामध्ये आपण तो समसमान वाटप केलेला होता , परंतु काही तांत्रिक अडचणींमुळे त्यामधील काही निधी जो आहे तो शिल्लक राहीलेला आहे. तो शिल्लक निधी प्रभाग क्रं. १० गट नं. १७४ मधील अंतर्गत रस्ते डांबरीकरण किंवा कॉंक्रींटीकरण करणे हा एक विषय मंजुर करून घेण्यात यावा ही एक विनंती करतो , जेणेकरून जो दलित वस्तीचा निधी जो आहे तो आपल्याला वापरता येईल व तो परत जाणार नाही अशी एक विनंती करतो.

**नगरसचिव :-** लेखी प्रस्ताव पाहीजे यासाठी

**श्री.कैलास सोनवणे :-** हो देताहेत ते.

**नगरसचिव :-** लेखी प्रस्ताव द्या.

**श्री.कुलभुषण पाटील :-** देतो.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २५९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सदयस्थितीत जळगांव शहर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती अडचणीची असल्यामुळे महानगरपालिका निधीतून विकास कामांसाठी तसेच नागरी सुविधांच्या कामासाठी निधी उपलब्ध करणे दुरापस्त व जिकरीचे आहे, मात्र महाराष्ट्र शासनाने सुरु केलेल्या नागरी दलित्तेतर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत शहरातील विकास कामांसाठी निधीची उपलब्धता करुन घेता येणे शक्य आहे. यास्तव नागरीकांच्या नागरी सुविधांच्या दृष्टीने आवश्यक असलेली खालील नमुद १६ विकास कामांचे एकूण रक्कम रु.४,०५,३८,०००/- मात्र चे अंदाजपत्रकीय तरतुदींना मान्यता प्रदान करण्यात येत आहे. प्रशासनाने तात्काळ पुढील कार्यवाही करावी.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | प्र.क्र.१५ मध्ये मोहम्मदीया नगर मधील खुल्या जागेस क्लब हॉल बांधणे व पेव्हर ब्लॉक बसविणे. | ३०.०० लाख |
| २ | प्र.क्र.१५ मधील गुलाबबाबा कॉलनी मधील खुल्या जागेस कुंपन भिंत बांधणे व पेव्हर ब्लॉक बसविणे. | ३०.०० लाख |
| ३ | प्र.क्र.१५ मधील महादेव मंदीराजवळ नाल्यावर पुल बांधणे | १५.०० लाख |
| ४ | प्र.क्र.१५ मधील संत गुलाब कॉलनी मागील रस्त्यावर स्लॅब कल्व्हर्ट बांधणे. | १०.०० लाख |
| ५ | प्र.क्र.१२ जय नगर ते ओंकारेश्वर मंदीर परिसर येथे आरसीसी गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे. | २७.८३ लाख |
| ६ | प्र.क्र.८ निमखेडी गट नं.१०१ मध्ये आरसीसी गटार बांधणे. | २३.९३ लाख |

| | | |
|---|---|---|
| ७ | प्र.क्र.५ मधील विविध ठिकाणी रस्त्याच्या बाजुला आरसीसी गटार बांधणे. | ३४.६२ लाख |
| ८ | प्र.क्र.१५ मध्ये मेहरुण अंतर्गत गावठाण भागात मनपा मालकीच्या खुल्या जागेत समाज मंदीर बांधणे. | २०.०० लाख |
| ९ | प्र.क्र.१८ अंतर्गत स.नं.१५/१ मधील हायवे लगतच्या खुल्या जागेस कुंपन भिंत बांधणे. | १५.०० लाख |
| १० | प्र.क्र.१२ मधील धांडे नगर मेहरुण शिवार स.नं.५६१/१अ व ५६१/१ब मध्ये बगीचा विकसित करणे कामी चेनलिंक फेन्सींग करणे. | २०.०० लाख |
| ११ | प्र.क्र.३ मधील खेडी भागामध्ये स्लॅब कल्व्हर्ट (गटारीवर ढापा टाकणे) आणि WBM रस्ते तयार करणे. | ७९.०० लाख |
| १२ | प्र.क्र.२ कांचन नगर मध्ये रस्त्यांवर ठिकठिकाणी पेव्हर ब्लॉक व सिमेंट कॉक्रींटीकरण करणे. | ४०.०० लाख |
| १३ | प्र.क्र.२ कुंभारवाडा येथे संरक्षण भिंत बांधणे. | ०५.०० लाख |
| १४ | प्र.क्र.२ परिसरातील मनपा खुल्या जागेत पेव्हर ब्लॉक बसविणे. | १०.०० लाख |
| १५ | प्र.क्र.२ प्ले सेंटर जवळ पेव्हर ब्लॉक व जिम साहित्य पुरविणे | १५.०० लाख |
| १६ | प्र.क्र.२ शिवाजी नगर गट नं.३३८ मधील ठिकठिकाणी बोळ मध्ये कॉक्रीट रोड करणे. | ३०.०० लाख |
| | **एकूण रक्कम -** | **रु.४,०५,३८,०००/-** |

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६३ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश**

**नगरसचिव :- आयत्यावेळेचा विषय क्रं:- २)** जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र. ०३ डि.पी.आरक्षण क्र.४८ जागेवर शाळा व स्पोर्ट हॉल व इमारत बांधणे कामी सन्मा.सदस्य श्री.नवनाथ दारकुंडे यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** विषय मान्य आहे.

**श्री.किशोर बाविस्कर :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.२६० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.३ डि.पी.आरक्षण क्र.४८ जागेवर शाळा व स्पोर्ट हॉल व इमारत बांधणे चे काम मुलभुत सोयी सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गतचे ५.०० कोटी अनुदान व ५.०० कोटी मनपा हिस्सा असे एकुण १०.०० कोटी निधी अंतर्गत महासभा ठराव क्र.२०४ दि.२९/०८/२०१९ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर कामाचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेच्या शिफारसी करीता जिल्हाधिकारी जळगांव यांच्या कडेस सादर करण्यात आला असता सदर योजने अंतर्गत निधी खर्च करण्याची मुदत दि.३० सप्टेंबर २०१९ रोजी संपलेली असल्याने सदर कामाचा प्रस्ताव मनपा कडेस परत पाठविण्यात आलेला आहे. अदयापपावेतो शासनाने सदर निधी खर्च करण्याकरीता मुदतवाढ देण्याबाबत आदेश पारित केलेला नसल्याने सदरचे काम मनपा निधीतुन प्रस्तावीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच शासनाने सदर योजने अंतर्गतचा निधी खर्च करण्यास मुदतवाढ दिल्यास सदर कामाचा खर्च मुलभुत सोयी सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गतचे ५.०० कोटी अनुदान व ५.०० कोटी मनपा हिस्सा असे एकुण १०.०० कोटी निधी अंतर्गतचे निधीतुन करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. प्रशासनाने तात्काळ पुढील कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६३ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश**

**नगरसचिव :- आयत्यावेळेचा विषय क्रं:- ३)** महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियाना अंतर्गत नागरी सुविधांचा विकास कामां अंतर्गत १) प्रभाग क्र.१५ मध्ये या.दे.पाटील शाळेच्या खुल्या जागेपासून ते महादेव मंदीराच्या पुलापर्यंत दोन्ही बाजुला नाल्यास संरक्षण भिंत बांधणे कामाचे रक्कम रु.६० लक्ष मात्र चे खर्चास तसेच २) प्रभाग क्र.१९ मधील स.क्र.२७३ मधील नाला क्रॉक्रींट बांधकाम करणे कामी रक्कम रु.४५ लक्ष मात्र खर्चाचे प्रस्ताव तयार करुन शासनास सादर करणेबाबत सन्मा.सदस्य श्री.सुनिल सुपडू महाजन यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.सुनिल महाजन:-** विषय मान्य आहे.

**श्री.चेतन सनकत :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.२६१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सदयस्थितीत जळगांव शहर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती अडचणीची असल्यामुळे महानगरपालिका निधीतून विकास कामांसाठी तसेच नागरी सुविधांच्या कामांसाठी निधी उपलब्ध करणे दुरापस्त व जिकरीचे आहे, मात्र महाराष्ट्र शासनाने सुरु केलेल्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाअंतर्गत शहरातील विकास कामांसाठी निधीची उपलब्धता करुन घेता येणे शक्य आहे. यास्तव नागरीकांच्या नागरी सुविधांच्या दृष्टीने आवश्यक असलेली खाली नमुद ०२ विकास कामांचे एकूण रक्कम रु.१,०५,००,०००/- मात्र चे अंदाजपत्रकीय तरतुदींना मान्यता प्रदान करण्यात येत आहे. प्रशासनाने तात्काळ पुढील कार्यवाही करावी.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१५ मध्ये या.दे.पाटील शाळेच्या खुल्या जागेपासून ते महादेव मंदीराच्या पुलापर्यंत दोन्ही बाजुला नाल्याला संरक्षण भिंत बांधणे. | रु.६०.०० लाख |
| २ | प्रभाग क्र.१९ मधील स.क्र.२७३ मधील नाला कॉक्रींट बांधकाम करणे. | रु.४५.०० लाख |
| | एकूण - | रु.१,०५,००,०००/- |

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६३ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- महाजन सुनिल सुपडू**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव :- आयत्यावेळेचा विषय क्रं:- ४)** रामलालजी चौबे म.न.पा.माध्य.विदयालयात मुलामुंलीसाठी (Co-Education) एकत्रीत शिक्षण सुरु करणेस परवानगी मिळणेबाबत सन्मा.सदस्य श्री.सचिन भिमराव पाटील यांचे पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.सचिन पाटील :-** विषय मान्य आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.२६२ पारित करण्यात आला.**

जळगांव शहर म.न.पा.संचलीत रामलालजी चौबे कन्या विदयालयात २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून केंद्र सरकार तर्फे व्यावसायिक शिक्षण सुरु करण्यात आलेले आहे. त्यानुसार मल्टीस्किल व ब्युटी अण्ड वेलनेस असे दोन कोर्सेस सुरु आहेत. त्यासाठी केंद्र सरकार तर्फे स्वतंत्र प्रशिक्षित शिक्षक उपलब्ध आहेत. हे कोर्सेस इ.९ वी व १० वी तील मुलामुलींसाठी आहेत. त्यासाठी आत्याधुनिक साहित्यासह केंद्र सरकारने दोन स्वतंत्र लॅब उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

इ.१० वी नंतर ITI (औदयोगीक प्रशिक्षण) आणि अभियांत्रिकी डिप्लोमासाठी प्रवेश घेणाऱ्या विदयार्थ्यांना राखीव जागा उपलब्ध असतात. म्हणून शालेय परिसरातील इतर सर्व शाळांमधील गरीब व होतकरु मुलांना या व्यावसायिक शिक्षणामुळे मुलांना स्वयंरोजगार उपलब्ध होवू शकतो तसेच मुले स्वत:च्या पायावर उभे राहू शकतात.

मनपा ची रामलालजी चौबे माध्यमिक शाळेस मुलामुलींची (Co-Education) शिक्षण पध्दती सुरु करणेस जुन २०२०-२१ या कालावधीपासून परवानगी देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६३ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- पाटील सचिन भिमराव**
**अनुमोदक :- अड.हाडा शुचिता अतुलसिंह**

**नगरसचिव :- आयत्यावेळेचा विषय क्रं:- ५)** प्रभाग क्र.१० मध्ये गट नं.१७४/ब मधील रस्ते डांबरी करणे कामी सन २०१९-२० मधील उर्वरीत दलितवस्तीचा निधी मिळणे बाबत सन्मा.सदस्य श्री.कुलभूषण विरभान पाटील यांचे पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** विषय मान्य आहे.
**श्री.चंद्रशेखर पाटील :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.२६३ पारित करण्यात आला.**

सन २०१९-२० मध्ये जळगांव शहर महानगरपालिकेस दलित वस्ती योजने अंतर्गत महाराष्ट्र शासनाकडून निधी प्राप्त झाला होता. सदर निधी शहरातील प्रत्येक प्रभागात समसमान देण्यात आलेला होता परंतू त्यापैकी काही कामे तांत्रीक अडचणीमुळे त्या निधी अंतर्गत होऊ शकत नसून सदर निधी हा प्रभाग क्र.१० मध्ये गट नं.१७४/ब मधील रस्ते डांबरीकरण करणेकामी रक्कम रु.२७ लक्ष मात्र वर्ग करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. प्रशासनाने तात्काळ पुढील कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६३ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- पाटील कुलभूषण विरभान**
**अनुमोदक :- पाटील चंद्रशेखर शिवाजी**

**नगरसचिव :-** मा.महापौर महोदया व सभागृहाला विनंती करतो की, महानगपालिकेचे कामकाजाचे नियमन या संबंधित तरतूदीनुसार आयत्या वेळेचे विषय विषय पत्रिकेवर घेणे आवश्यक असते म्हणुन सन्मा.सदस्यांनी कृपया आयत्या वेळेचे विषय हे विषय पत्रिकेवर घेण्यात यावे ही नम्र विनंती.

**श्री.सुनिल महाजन :-** यापुढे आयत्या वेळेचे विषय विषयपत्रिकेवर घेण्यात यावे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** मला एक बोलायचे आहे. आपले डिमार्ट ते काव्य रत्नावली चौक या रोडाचे साईड पट्टयांचे काम चालु आहे आणि मी आपला अमृत योजनेचा जो नकाशा आहे शहराचा त्यामधुन माहिती घेतली असता नकाशा संबंधित इंजिनियर कडुन बघतिला तर डिमार्ट ते काव्य रत्नावली चौका दरम्यान जे रोडावरील जे घरं आहेत त्यांच्यासाठी पाईपलाईन ची व्यवस्था त्या नकाशा मध्ये दिसुन येत नाही . संबंधित जे अधिकारी आहेत . खडके साहेब असतील त्यांना पण मी फोनवरून बोललो , बोरोले साहेब आहेत त्यांच्याशीही मी फोनवरून व भेटुनही चर्चा केली . काल मी भोळे साहेबांच्या कानावरही टाकले की साईडपट्टीचे काम चालु आहे तर ते व्हायच्या आधी जर आपण तिथे पाईपलाईन टाकली तर ती साईडपट्टी परत खोदण्याची वेळ येणार नाही त्या साईडपट्टीचे जर डांबरीकरण होवुन गेलं व महिन्याभराने जर आपण ते परत खोदले तर संबंधित जे नागरीक आहेत त्या रोडवरील ते परत आपल्याकडे तक्रार करतील आणि त्याचा त्यांना त्रास होईल म्हणुन आपण ते साईडपट्टी पुर्ण होण्याच्या आधी तिथे पाईपलाईन टाकण्यात यावी अशी मी सुचना करतो .

**सौ. दिपमाला काळे :-** ख्वॉजामिया चौकाचे जे अतिक्रमण काढण्यात आले होते पण ते पुर्ण पणे अजुन काढले गेले नाहीये, म्हणजे ख्वॉजामिया चौफुली पर्यंतच काढले होते कोर्टापर्यंतचा रस्ता तसाच आहे तर ते काढण्यात यावे, आणि दर्ग्याजवळचा जो रोड आहे हा मोकळा आहे आणि तिथे फार अडचण होते गाडयांना वाहतुकीची फार कोंडी होते, त्यामुळे ते पण काढण्यात याव आणि ख्वॉजामिया चौकातील जी जागा आपण भाजीपाला वाल्यांना दिली आहे त्यांची सोय करण्यात यावी आणि गोकुळ स्वीट मार्ट जवळचा जो पोल आहे तो एकदम रस्त्यातच आहे तोही काढण्यात यावा आणि दोन्ही चौकातील अतिक्रमण काढण्यात याव.

**श्री.कैलास सोनवणे :-** दिपमालाताई काळे यांनी जे आता सांगीतले की, कोर्टापासुन ते गणेश कॉलनी चौकापर्यत जे अतिक्रमण आहे . तर तुमची जी मोहीम आहे ती तिकडे वळवा आणि काढा ते फार दिवसांपासुन मागणी करीत आहे.

**सौ. दिपमाला काळे :-** कोर्टापासुन ते गणेश कॉलनी चौकापर्यत जो रोड आहे त्या ठिकाणी ओटे व ईतर बांधकाम भरपुर ठिकाणी बांधकाम केल्याने अतिक्रमण झालेले आहे ते एक काढण्यात यावे . कारण जो डिव्हायडर आहे त्यामुळे फार कोंडी होते .

**मा.उपायुक्त , अजित मुठे :-** बरोबर आहे , आपण नोटीसा दिल्या आहेत की ज्यांनी ओटे बांधलेले आहेत रस्त्यापर्यंत ते ७ दिवसांच्या आंत काढु न घ्या व त्याला ७ दिवस पुर्ण झाले आहेत . आज त्या ठिकाणी ओटे तोडायला जाणार होते आणि उद्यापासुन ते काढुन घेवु .

**सौ. दिपमाला काळे :-** ते लवकरात लवकर काढण्यात यावे कारण लोकांच्या आमच्याकडे ईतक्या तक्रारी येतात की ते कधी काढणार आहेत असे प्रश्न विचारतात आम्हाला .

**मा.उपायुक्त , अजित मुठे :-** आता आम्ही तो आयसीआयसीआय बँकेचा जो ओटा आहे ना तो आम्ही तोडणार .

**सौ. दिपमाला काळे :-** तो दर्ग्याजवळचा जो भाग आहे ना तोही स्वच्छ करून त्याचेही मोजमाप करून व्यवस्थित करण्यात यावा.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय , वॉटर ग्रेसच्या संदर्भात

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर ताई हया बाबतीत

**श्री.कैलास सोनवणे :-** भाऊ तुम्ही थांबा थोडे .

**श्री.नितीन लढ्ढा :-** आप्पा त्या रोडासंदर्भातच आहे ना

**श्री.कैलास सोनवणे :-** साहेब त्यांच्या मंडळींना भेटा तिथे जावुन व व्यवस्थित समजावुन करून टाका .

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर महोदया, त्या रस्त्यावर मोठयाप्रमाणात वाहतुकीची कोंडी होते अश्या वेळेला आपण ज्या पध्दतीने कारण मुस्लीम समाजाचे धार्मिक स्थळ आहे आपण हायवेच्या अजिंठा चौफुलीवर आपलं एक दत्तांचे, श्रीकृष्णाचे मंदिर होते ते मंदिर आपण काढले. जिथे जिथे वाहतुक व्यवस्थेला अडचणी येत असतील . तिथे ते धार्मिक स्थळ कुठल्या समाजाचे आहे हे पाहण्याची आवश्यकता नाही. तर त्याच्या संदर्भातही त्या नागरीकांना ख्वॉजामियॉं ट्रस्टचे जे पदाधिकारी असतील त्यांना विश्वासात घ्या आणि विश्वासात घेवुन ते धार्मिक स्थळ आतमधील जागेत शिफ्ट करा. म्हणजे जेणेकरून तिथली वाहतुक कोंडी तरी कमी होईल. आपण पाहातात की तिथे मोठया प्रमाणात वाहतुक कोंडी होते. ते तातडीने करणे गरजेचे आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय , घंटागाडया आणि ट्रॅक्टर पुरविणे त्यांचे काम आहे म्हणजे ते चालवायचे आता काही लोकांना त्यांनी पगार दिलेले नाहीत ते टेंपररी लोकं वापरता आहेत. पुर्ण जळगांव शहरात घंटागाडया व्यवस्थित येत नाहीत. पुर्वीचे ड्रॉयव्हर निघुन गेलेले आहेत आता त्यांनी नवीन ड्रॉयव्हर लावलेले आहेत त्यांना गल्ल्यां माहिती नाही त्याच्यावर लवकरात लवकर कार्यवाही करण्यात यावी.

**श्री.विष्णु भंगाळे :-** वॉटर ग्रेस च्या बाबतीत आता नवनाथ भाऊंनी जो मुद्दा मांडला त्या संदर्भात मी मागे त्याची सर्व माहिती मागीतलेली होती . कलम ४४ अन्वये त्याची माहिती मला देण्यात आली परंतु तो विषय विषय पत्रिकेवर आलेला नाही . तो महासभेत येणे उचित होते, परंतु तो मागच्या वेळेस सुध्दा घेतला गेला नाही व आता सुध्दा घेतला गेला नाही. आणि त्याचे गांभीर्य असे आहे जर मी एक क्लीप आता सभागृहाला ऐकवली तर तुम्हाला ती ऐकुन धक्का बसेल, ज्या दिवसापासुन आपण त्यांना गाडया दिल्या त्यांची सर्विसिंग तर नाहीच . परंतु स्टेपनी कशी काढुन विकायची याबाबतीतील

माझ्या मोबाईल मध्ये त्याची क्लीप आहे आणि त्याचे एक संभाषण आहे. म्हणजे त्याच्यावरून आपण किती गांभीर्यआहे की आपल्या गाडयाचे पार्ट उद्या सुध्दा जावु शकतात. गाडया कोणत्या पोझिशन ला होत्या व त्या कश्याप्रकारे होवु शकतात **(मोबाईल मधील ऑडीओ क्लीप ऐकवली)** महापौर महोदय हे आपल्या वॉटर ग्रेस चे अधिकारीच आहेत आणि वॉटर ग्रेसच्या गाडीवर असलेला ड्रायव्हर आणि त्या एरीयाचा जो अधिकारी असेल त्याच संभाषण आहे . म्हणजे अश्या पध्दतीने मी मागे सुध्दा स्टँडींगला दरवेळेस हे विषय मांडलेले होते कि आपल्या गाडयांचे आत्तापर्यंत एकदा सुध्दा सर्विसिंग झालेली नाही . आपण आपल्या सुस्थितीत असलेल्या गाडया त्यांना दिलेल्या आहेत आणि एक महोदय सभागृहात सांगावेसे वाटते ८० लाख दंड एका महिन्यात होवु शकतो म्हणजे ही सुध्दा एक किमया आहे म्हणजे ८० लाख दंड होत असेल वॉटर ग्रेस कंपनीला आणि तरी आपण तो चालवत असेल तर कशासाठी तो चालु आहे. आणि आज आपण जळगांव शहरातील साफसफाईची जी लेव्हल आहे ती निश्चित करावी . कारण आम्ही बोलुन बोलुन थांबलो आता .

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** ८० लाख दंड आहे हे तुम्हाला कोणी सांगीतले .

**श्री.विष्णु भंगाळे :-** कागदोपत्री माहिती आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** बरोबर आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** कागदोपत्री आहे आणि आत्ता एवढा मोठा गठ्ठा आहे माझ्या गाडीतच आहे .परंतु मी म्हटंले की तो विषय जर आला तर मी ते येथे आणेल परंतु तो विषय आला नाही म्हणुन मी एक क्लीप आपल्याला ऐकवलेली आहे. तरी याची जबाबदारी वॉटरग्रेस चा जो ठेकेदार आहे त्याच्यावर टाकावी . येणाऱ्या काळात आपल्या ज्या गाडया आपण त्याला सुस्थितीत दिलेल्या आहेत त्या सुस्थितीत असल्या पाहीजे. आणि जळगांव शहरातील असलेला कचरा आज काही फोटो सुध्दा मला आलेले आहेत की येणारी गाडीमध्ये तिथे मातीचे प्रमाण जास्त जात आहे, दगड जाताहेत. वजनावर आपण तो कचरा उचलतो .कचरा एक एक गाडी ८ / ८ टन ते ११/११ टन जर येत असेल तर हे नवलचं आहे. परंतु कचऱ्याच्या ऐवजी जर माती भरली जाते, दगडं भरले जातात आणि तिथे आल्यानंतर ते चेक करा किंवा तिथुन फोटो आल्यानंतर त्याची लाईव्ह त्याची परिस्थिती काय आहे. महापौर महोदया आपण वॉटरग्रेसच्या बाबतीत लक्ष घालावं. जेणे करुन जळगांव शहराची साफसफाई चांगल्या प्रकारे झालीच पाहिजे. हाच प्रयत्न आमचा आहे. दर वेळेला मी असो, नितीन भाऊ असो दर वेळेस सभागृहामध्ये मांडलेला आहे. प्रभाग क्र.५ हे पुर्णपणे मार्केट ऐरिया असेल रहिवास एरिया असेल. दर वेळेला या भागातील फोन आम्हाला कोणते ना कोणते माध्यमातुन येत असतात. म्हणुन आम्ही येथे सांगु इच्छीतो, दंडवते साहेब असतील किंवा आयुक्त साहेब असतील. ज्या घटना घडलेल्या महापौर महोदया सकाळी आयुक्त साहेबांच्या कानावर जाणेच्या आधी किंवा दंडवते साहेबांच्या कानावर जाण्याच्या आधी व्हॉटसाप वरती त्यांना क्लिपा टाकलेल्या आहे की, आज तुमचे इतके ड्रॅायव्हर आले नाही इतक्या गाडया बंद आहे. आज इतक्या प्रमाणे अस काम सुरु आहे. तरी आपणास एकच विनंती आहे, जळगांव शहर साफसुतरं, सुंदर, स्वच्छ होण्याच्या दृष्टीने आपण याच्यावर पाऊलं उचलाव हीच एक विनंती सभागृहाच्या वतीने करतो.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** आता विकास कामांच्या अनेक वर्कऑर्डरी देऊन ठेवल्या आहे. परंतु ते काम ही करत नाही त्याच निर्णय ही लागत नाही. अस काय आहे सांगाव साहेबांनी. विकास काम काय आहे. आमच्या प्रभागामध्ये माझ्या निवास स्थानापासुन ते तलावा पर्यंत रोड खोदुन ठेवलेल आहे. अशी वर्कऑर्डर दिलेली आहे.ते होत नाही. काय अडचण आहे ते ही सांगत नाही.एक एक वर्ष झालं आहे वर्कऑर्डर देऊन का होत नाही काय कारण आहे साहेबांनी सांगाव.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आधी मी प्रश्न विचारलेला आहे त्याच स्पष्टीकरण मला प्रशासनाकडुन हव आहे.

**मा.महापौर :-** दंडवते साहेब उत्तर द्या.

**श्री.धिरज सोनवणे :-** साहेब माझ्या प्रभागामध्ये घंटागाडी एक महिना झाली बंद आहे, एस.आय आणि सी.एस.आय. ला विचारल, त्यांनी वरच्या लेव्हलला दंडवते साहेबांकडे तक्रार केली. दत्त कॉलनी, ज्ञानेश्वर गल्ली, नुतन मराठा, प्रताप नगर, हाऊसींग सोसायटी या भागातील नागरीकांच्या रोज तक्रारी येत आहे. आजच्या परिस्थितीत ते इतके आक्रमक आहे की, ते म्हणत होते की, आज आम्ही महानगरपालिकेत मोर्चा घेऊन येऊ. पण मी त्यांना कशी तरी विनंती केली, थांबविल. मी दंडवते साहेबांना सांगितल की, एक महिन्या पासुन घंटागाडी बंद आहे तर त्यांनी सांगितल की, संबंधीत जो ठेकेदार आहे तो आम्हाला सहकार्य करत नाही. मग आम्ही तक्रार कोणाकडे करायची.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेबा, मला संपुर्ण सभागृहास सांगायचे आहे. वॉटरग्रेसचा मक्तेदार आला, बुके दिला आणि मध्ये घेऊन गेला आणि सांगितल, १०-१२% काय असेल ते करुन टाकतो मी, मी म्हटल, नितीन भाऊंकडे जा तु पहिले, नितीन भाऊच जास्त बोलता तुझ्याबद्दल, पहिले त्यांना मॅनेज कर, ते मॅनेज होता का पहा, नंतर माझ्या कडे या. मी त्याला पाठविलेल होत तुमच्याकडे आला नशीन तुमच्याकडे तो.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई, आज काय झालं सकाळी, वॉटरग्रेसचे ५ ट्रॅक्टर उचलुन घेऊन गेले आर.टी.ओ. साहेब सकाळी, ट्रॉल्या पासींग नव्हते. काय झालं त्यांच.

**मा.उपायुक्त, श्री.दंडवते, आरोग्यविभाग :-** मा.महापौर साहेब, विष्णु भाऊंने जो मुद्दा उपस्थित केला की, त्याला ८० लाखाचा दंड झालेला आहे. ते बरोबर आहे. डिसेंबर महिन्यात त्याला आम्ही ७९ लाख असा काही तरी दंड आम्ही लावलेला आहे. त्याच बिल डिसेंबर महिन्याचा काही देय नाही त्याच्याकडुन उलट आपल्याकडे वसुली निघत आहे. ५-६ लाख रुपये त्याच्याकडुन घेणे दाखवत आहे. मागच्या दंडाचा विषय जे आहे मी सुनावणी घेतलेली आहे. ती आयुक्त साहेबांकडे ठेवलेली आहे.

**श्री.धिरज सोनवणे :-** वॉटरग्रेसचा आणि प्रशासनाचा किती दिवसापासुन वाद चालु आहे तर हे काम आता पर्यंत सुरळीत का होत नाही.

**मा.उपायुक्त, श्री.दंडवते, आरोग्यविभाग :-** पहिले तीन महिने आपण त्यांना ट्रायल दिले.

**श्री.धिरज सोनवणे :-** प्रत्येक महासभेमध्ये प्रत्येक नगरसेवक हा तक्रार करतो. रोज तुम्हाला फोनवर तक्रार येत आहे. मग तुम्ही सुरळीत काम करत नाही. तुम्हाला काय अडचण येते यात.

**मा.उपायुक्त, श्री.दंडवते, आरोग्यविभाग :-** सुरळीत करण्यासाठी आम्ही यापुर्वी त्याला चार नोटीसा दिल्या.अंतिम नोटीस पण दिलेली आहे. ज्या वेळेला त्यानी जर कोर्टात दावा दाखल केला तर आपली बाजु सुध्दा सक्षमपणे आपल्याला मांडता आली पाहिजे. या अनुषंगाने त्यातला जे काही व्हॅल्यु जी आहे मागच्या ४ महिन्याची. ती व्हॅल्यु आपण कागदावर घेतलेला आहे. त्या अनुषंगाने आम्ही अंतीम नोटीसीचा खुलासा घेऊन आयुक्त साहेबांकडे ठेवु.

**श्री.धिरज सोनवणे :-** मग नागरीकांना का वैठीस धरत आहात. आपली यंत्रणा लावुन कामे सुरु करा. आपल्याकडे आहे ना ती पावर.

**मा.उपायुक्त, श्री.दंडवते, आरोग्यविभाग :-** त्यासाठी आम्ही टेंडर प्रक्रिया सुरु केली आहे.

**श्री.धिरज सोनवणे :-** त्याच्याशी आपला वाद चालु आहे. उद्या जर त्यानी सर्व यंत्रणा बंद ठेवली तर आपण काय करणार आहे.

**मा.उपायुक्त, श्री.दंडवते, आरोग्यविभाग :-** त्याच्यासाठी आपण एक नियोजन करणार आहे.

**श्री.धिरज सोनवणे :-** सुरूवातील मी निविदा दिली होती साफसफाई च्या संदर्भातील व वाहनांच्या संदर्भातील तिन महिन्यांची मुदतही दिली होती एकदा दिल्यानंतर पुर्ण व्हायला पाहीजे होते .

**श्री.नितीन लढढा :-** दंडवते साहेब हे जे तीन महिन्याचा ग्रेस पिरीयेड आहे हे नेमकं कशासाठी आहे. त्यानी जर या तिन महिन्यामध्ये काहीच काम नाही केल तरी त्याच बिल क्लीयर आऊट होईल का? तो तीन महिन्यातल्या दंड माफीच्याही काही मी टिप्पण्या वाचल्या. खाते प्रमुख टिप्पणी लिहत आहे. अधिक्षक त्याच्यावर वेगळ रिमार्क मारतो, पुन्हा त्या टिप्पण्या बदलविले जाता की, तीन महिन्याच दंड आकारु नये. आणि तीन महिन्याचा दंड आकारावा असे दोन टिप्पण्या मला या प्रकरणात दिसता. नेमका तिन महिन्याच दंड का आकारु नये. म्हणजे मक्तेदाराला हा तीन महिन्याचा दंड वे आऊट करण्याच्या दृष्टीकोणातुन प्रशासनात विसंगती का आहे.

**मा.उपायुक्त, श्री.दंडवते, आरोग्यविभाग :-** याच्यामध्ये त्याला पहिले तीन महिने कामाची प्रक्रिया सुरळीत लावण्यासाठी हा पिरीयेड दिलेला आहे. परंतु ज्या अनुषंगाने त्याने पहिल्या दिवसापासुन गाडया, लेबर, ड्रायव्हर आणि जी काही मशिनरी आहे. ती सगळी जर पुरविली नाही तर आम्ही त्याच्यावर दंड आकारणी केलेली आहे. त्यात आयुक्तांच्या सुचनेप्रमाणे मी सुनावणी घेतलेली आहे. त्या सुनावनीच्या अनुषंगाने बिल विभाग असेल आणि ऑडीटर असेल. ती सुनवणीचा आदेश योग्य आहे की अयोग्य आहे याबाबत आयुक्त साहेबांनी ही सुनावणी घेतली. परंतु माझ्या स्तरावर सुनावणी घेतांना मी

असा आदेश दिलेला आहे की, गाडया, लेबर, ड्रायव्हर आणि इतर मशिनरी न पुरविण्याबाबत त्याला जो दंड केलेला आहे तो वसुल करणे आवश्यक आहे.

**श्री.नितीन लढढा :-** कसला दंड आकारणी केलेला आहे. वाहनांवर आपण कसली आकारणी करतो. ज्या ज्या ठिकाणी कचरेचे ढिग दिसुन आले आहे त्याच्या प्रमाणे दंडाची आकारणी केलेली असेल. म्हणजे तितपर्यंत त्या मोकादमची त्या एस.आय.ची भुमिका योग्य दिसुन येते. परंतु त्याला वाचविण्याच्या दृष्टीकोणातुन आपले काही उच्च अधिकारी अश्या पध्दतीचे पळवाट काढतात की, त्याला पहिल्या तीन महिने त्यांना तो ग्रेस पिरीयड आहे. ग्रेस पिरीयड कसा आहे जी.पी.एस. सिस्टीम त्याच्यावर लागली नसेल. तर समजु शकतो. परंतु जो मुळ जेष्ठ आहे की, गांवाचा ओवरफलो कचरा उचलायला पाहिजे. शहरातील कचरा कुंडया या खाली व्हायला पाहिजे. शहर कचरा मुक्त राहिल पाहिजे. जर या बेसिक गोष्टीला जर पाटा बसत असेल. आणि त्याच्या अनुषंगाने जर एस.आय. दंडात्मक कार्यवाही करत असेल. तर मला वाटत याच्या वरती कोणही अहवाल पुटअप करण, त्याच्यासाठी आयुक्तांकडे सुनावणी ठेवण, मला वाटत आहे हे सुयुक्तीक ही दिसत नाही.हा कुठे तरी पळवाट काढण्याच्या पध्दतीने अश्या कुठल्यातरी सुनावण्यांची प्रोव्हीजन केली जात आहे.

**मा.उपायुक्त, श्री.दंडवते, आरोग्यविभाग :-** याच्या मध्ये पळवाट काढण्याचा कोणताही प्रयत्न नाही. ॲग्रीमेंट मध्ये जे काही अटीशर्ती आहे. त्याप्रमाणे त्याला गाडयांचे लोड तयार करणे, सर्व यंत्रणा सुरळीत करणे, जी.पी.एस.तयार करणे या सर्व बाबींसाठी आपण त्याला टाईम पिरीयड दिलेला आहे. या बाबींचा दंड वसुल करणे या करारनाम्यातील अटीशर्तींच आकलन मला कुठ पर्यंत झाल तितपर्यंत या बाबींचा दंड त्यांना पहिल्या तिन महिन्यात लागु होत नाही.

**श्री.नितीन लढढा :-** अटीशर्तीच्या अनुषंगाने त्याला तीन महिन्यापर्यंत माफी द्यायची. मला सांगा ज्या वेळेला जो कोणी मक्तेदार निविदा दाखल करतो, त्या निविदेतल्या सगळया अटीशर्ती ज्या वेळेला प्रसिध्द होतात त्या वेळेला त्यात असतात. खरे अर्थाने ज्या वेळेला तुम्ही त्याला कार्यादेश देतात. त्या कार्यादेशाच्या दिनांकापासुन ही सर्व मक्तेदाराची जबाबदारी आहे की, त्याने निविदेतील अटीशर्तीचा योग्य पध्दतीने पालन केलेल आहे की नाही. नाही तर ह्या सर्व अटीशर्ती पहिले पुर्ण होऊ दिल्या असत्या आणि मग तिन महिन्यानंतर कार्यादेश दिला असता. तो पर्यंत आपली जी पुर्वीची यंत्रणा चालु होती त्या प्रमाणे काम चालु राहिल असत. अश्या पध्दतीने घाई घाई मध्ये मक्ता दिला गेला का ? मला सांगा, १५ ऑगस्ट पासुन या मक्त्याची सुरुवात झालेली आहे. १५ ऑगस्ट ते आज फेब्रुवारी जवळपास ६ महिन्याचा कालावधी झालेला आहे. आणि ६ महिन्याच्या कालावधी मध्ये प्रत्येक स्थायी समितीची सभा असेल प्रत्येक महासभा असेल, एकही सभा या वॉटरग्रेसच्या विषयावर चर्चा झाल्याशिवाय झालेली दिसत नाही. मग त्या वेळेला प्रशासन असतील, विरोधी असतील सत्ताधारी असेल अधिकारी असतील किंवा शहराचे नागरीक असतील. संपुर्ण शहराची नाराजी असतांना सुध्दा या मक्तेदारावर ऐवढी महेरबानी ठेवण्याचे प्रयोजन काय ? आपण पाहतो की, एका १०-२० हजार रुपयाचे कामाचा कॅन्ट्रॅक्टर असेल त्याच्याकडुन काही चुका झाल्या असेल तर आपण तातडीने त्याला काळया यादीत टाकण्याच्या भुमिका करतो, परंतु सातत्याने ६ महिने होवुन सुध्दा कोट्यावधी रुपयांचा खर्च त्याच्यावर महानगरपालिकेच होणार आहे . यापुर्वी शहराची स्वच्छता करण्यावर महिन्याचा ६० लाख रू खर्च व्हायचा आणि आज १ कोटी २० लाख रूपये खर्च होतोय.६० लाख रूपयामध्ये होणारी स्वच्छता त्यावेळेची स्वच्छता याच्यापेक्षा चांगली होती. आज त्याच्यापेक्षा स्वच्छता वाईट आहे आणि खर्च दुप्पट आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** आकडे चुकीचे सांगता आहे तुम्ही ६० लाख नाही ७५ होते.

**श्री.नितीन लढढा :-** ६० लाखच आहे ना आप्पा ३ लाख प्रमाणे २० प्रभागांचा ६० लाख होत ना आप्पा.

**श्री.कैलास सोनवणे :-** आकड्यांमध्ये तफावत आहे ऐवढा फरक नाही. वॉटरग्रेस वाला दोषी आहे याच्या मध्ये दुमतच नाही. त्या दृष्टीने पाऊलंपण उचलता आहे. मी सुध्दा त्यांच्याशी बरेच वेळा बोललो आहे. आणि साहेब त्यांचा जो दंडाचा विषय आहे त्या दंडात त्याला माफी करता कामा नये. भाऊंच्या बोलण्यापासुन अस लक्षात आल की, टिप्पण्या बदलता आहे, म्हणजे १००% शेण खात आहे कोणीतरी, जर टिप्पण्याबदलवता आहे मत बदलत आहे म्हणजे त्याला पहिले वेठीस धरायच पैसे देण्यासाठी मग नंतर बदलवायचे पैसे घेतल्यानंतर. काही गोष्टी आम्हालाही समजतात हे. आगोदर आम्ही अस समजतो की, नजर चुकीने झाल असेल. दुसऱ्यांदा आम्ही त्याच अस निष्कर्ष काढतो की हे मुद्दाम होत आहे. त्याच्यानंतर आम्ही त्याच मत बनवतो आणि मत बनविल्यानंतर त्याच्यावर कामकाज बघतो. बिल अदा करण्याबाबत सुध्दा उपमहापौर

श्री.अश्विन सोनवणे यांनी वारंवार तुम्हाला पत्र दिलेले आहे. जर तुम्ही नागरीकांना वेठीस धरत असेल तर त्याला माफी नाही.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आता पर्यंत केव्हापासुन ठेका घेतलेला आहे. किती दंड घेतलेला आहे.

**मा.उपायुक्त, श्री.दंडवते, आरोग्यविभाग :-** सुरुच्या पहिल्या महिन्यात रु. ३,८८०००/- दंड वसुन केलेला आहे. आणि दुसऱ्या महिन्यात २९ लाखाचा दंड वसुल केलेला आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** आणि आपण बिल कितीच देतो.

**मा.उपायुक्त, श्री.दंडवते, आरोग्यविभाग :-** आपण बिल देतो, रु.८० लाखाच, एकुण ७० लाखाच आता पर्यंत आपण बिल दिलेल आहे. दंडाच्या बाबतीत टिप्पणी कोणत्याही प्रकारे बदललेली नाही. ती आपल्याकडे फाईल पाहायला मिळेल. अट क्र.३२ नुसार मला जे आकलन झाल.त्या अनुषंगाने मी सुनावणीचा आदेश पारीत केलेला आहे. त्या आदेशावर अंतिम निर्णय आयुक्तांचा होईल. आयुक्तांनी जर तो आदेश अमान्य केला तर संपुर्ण दंड वसुल होईल.

**श्री.नितीन लढढा :-** टिप्पणी लिहुन आपण आयुक्तांकडे सादर करायला किती कालावधी झाला.

**मा.उपायुक्त, श्री.दंडवते, आरोग्यविभाग :-** डिसेंबर ऐंडला टिप्पणी सादर केलेली आहे.

**श्री.नितीन लढढा :-** म्हणजे तीन महिने झाले.

**मा.उपायुक्त, श्री.दंडवते, आरोग्यविभाग :-** सॉरी, जानेवारी ऐंडला टिप्पणी सादर केलेली आहे.

**श्री.नितीन लढढा :-** मग आपली जबाबदारी ही आहे की, आयुक्तांच्या मागे लागुन काम करुन घ्यायला पाहिजे.

**मा.उपायुक्त, आरोग्यविभाग :-** मी त्यांच्या समक्ष गेलो आयुक्तांशी चर्चा केली. त्याच्यावर मात्र मागच्या साहेबांची सही झालेली नाही. मी त्यांना दोन तीन वेळा रिक्वेस्ट ही केली. आता या साहेबांकडे ती फाईल इनवर्ड झालेली आहे.

**श्री.भागचंद जैन :-** साहेब टिप्पणी केव्हा ठेवली.

**मा.उपायुक्त, श्री.दंडवते, आरोग्यविभाग :-** जानेवारी ऐंडला.

**श्री.भागचंद जैन :-** म्हणजे ठेका द्यायला ६ महिने झाले तेव्हा.

**मा.उपायुक्त, श्री.दंडवते, आरोग्यविभाग :-** जानेवारी महिन्या मध्ये ही टिप्पणी तत्कालीन आयुक्तांकडे सादर केली होती.

**श्री.भागचंद जैन :-** आताच तुम्ही विष्णु भाऊंना सांगितल की, तीन महिन्यानंतरच आपण त्याला दंड करु शकतो.त्यामुळे टिप्पणी लिहायला आपल्याला काही प्रॉब्लेम आला का.

**मा.उपायुक्त, श्री.दंडवते, आरोग्यविभाग :-** नाही त्याच्यामध्ये . .

**श्री.भागचंद जैन :-** साहेब मला एक प्रश्न विचारायचा आहे तुम्हाला कैलास आप्पा जेव्हा सभापती होते तेव्हा ते स्पॉट व्हिजीट करायचे आता आप्पांच्या पत्नी महापौर आहेत आप्पांच्या पाठीमागे पाठी असल्यामुळे आणि ते सत्ताधारी आहेत मला थोडक्यात उत्तर द्या. आपण किती स्पॉट व्हिजीट केल्या साहेब ? आत्तापर्यंत आपण स्पॉट व्हिजीट केल्या ?

**मा.उपायुक्त, श्री.दंडवते, आरोग्यविभाग :-** म्हणजे साफसफाईच्या बाबत .

**श्री.भागचंद जैन :-** होय .

**मा.उपायुक्त, श्री.दंडवते, आरोग्यविभाग :-** आम्ही अनेक वॉर्डात व्हिजीट केलेल्या आहेत.

**श्री.भागचंद जैन :-** आत्ता माझा सहकारी नगरसेवक सांगतोय मागच्या ५ महिन्यापासुन हालत ईतकी खराब आहे , आत्ता ८ दिवसांपासुन लाईन लागलेली आहे विचारून घ्या.

**मा.उपायुक्त, श्री.दंडवते, आरोग्यविभाग :-** पिंप्राळयामध्ये मी तिन वेळा आलेलो आहे.

**श्री.भागचंद जैन :-** साहेब एका वेळी सुध्दा आलेले नाही. फोन जरी केला का आम्हाला,

**श्री.विजय पाटील :-** तुम्ही नगरसेवकांना भेटले का ?

**मा.उपायुक्त, श्री.दंडवते, आरोग्यविभाग :-** मी तिन वेळा येऊन गेलो पिंप्राळा मध्ये.

**श्री.भागचंद जैन :-** तुम्ही तीन वेळा आले, तुम्ही नाही भेटले सन्मा.नगरसेवकांना तुम्हाला तुमच्या पदाचा मान असेल तर तुमचे आरोग्याधिकारी बोलु शकले असते ना. आम्ही आलो असतो नाही आम्हाला काही लाज नाही. आमच्या नागरीकांच्या समस्या सोडवायचे आहे. सुनिल भाऊ आम्ही एक दुसऱ्याच्या विरोधात निवडुन आलो पण आम्ही

नागरीकांच्या प्रश्नांकरीता बोलतो आहे. आणि दंडवते साहेबांनी तेथे जे आज पर्यंत केलेल नाही. आरोग्याधिकारी कितीदा आले म्हणतात एकदा ही आलेले नाही.

**मा.उपायुक्त, श्री.दंडवते, आरोग्यविभाग :-** पिंप्राळा मध्ये दोन तीनदा आलेलो आहे.

**श्री.भागचंद जैन :-** महापौरताई, तेथे ना आपल्या बांधकाम अधिकाऱ्याला विचारल जात नाही. त्या रस्त्यावर पाईप टाकणेचे काम सुरु आहे काही तरी. वायफायचे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्याला विचारल कलेक्टरची परमीशन आहे. ते त्यांच्या मनमानी खुशाल मोठमोठे पाईप टाकता आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** कुठल्याही कंपनीने आपल्या रस्त्यावर काम करत असतांना महानगरपालिकेची परवानगी घेणे आवश्यक असते. आपल्याकडे आता पर्यंत त्या कॅन्ट्रॅक्टदाराने कोणती परवानगी घेतलेली आहे. आयुक्तांना विचारल माहित नाही, प्रशासनातल्या कोणत्या अधिकाऱ्याला विचारल त्यांना ही माहित नाही. पदाधिकाऱ्यांना माहिती नाही. अस माहित नसतांना आपल्या शहरात काम चालु आहे साहेब. म्हणजे ही फार मोठी शोकांतीका आहे की, आपल्याला काही माहित नसतांना इतका मोठा ठेकेदार आपल्या शहरात काम करतो आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर साहेब, आधी माझी एक विनंती आहे. आपल्या वाहन विभागाला जो कोणी आपल्या प्रभागात असेल ते टेम्पररी का असे ना. आपण याची नियुक्ती करावी. जेणेकरुन आपले वाहनांचे आणि इतर वाहन आरोग्यांचेच नाही. इतर वाहन खुप आहे आपल्याकडे, अधिकाऱ्यांचे गाडया असतील. ट्रकी असतील, लोडर असतील. यांच्याकडेलक्ष देण्यासाठी एक मॅकॅनिकल इंजिनिअरची किंवा डिप्लोमा इंजिनिअरची आवश्यकता आहे. याची नियुक्ती आपण आधी करावी. या माध्यमातुन काय होईल महापौर महोदय, जे येणार नुकसान आहे गाड्यांच ते थांबेल, कारण की ही प्रॉपर्टी आपली मनपाची आहे. एकतर तो साफसफाई करत नाही. आणि आपल्या गाडया वापरुन विविध गाडयांचे, माझी एक विनंती आहे आपणास आजपासुन ज्या गाडया वॉटरग्रेसला दिलेले आहे त्या गाडयांच सर्व्हेक्षण कराव. त्याचे पार्ट कोणतेकोणते गेलेले आहे. आणि कोणते साबुत आहे. याच सर्वेक्षण करुन याचा अहवाल येणाऱ्या महासभेत द्यावा. वॉटरग्रेसचा जे मी म्हटलो होतो. कलम ४४ खाली मी प्रश्न टाकलेला आहे. नक्कीच त्याच्यावर सविस्तर चर्चा सुध्दा आपणास करता येईल. परंतु आमच सभागृहाला एकच म्हणण आहे. जर हा चांगल्या प्रकारे साफसफाई करतच नसेल. सगळया गोष्टीत तो कमी पडत असेल. तर आपण त्याला का मौनटिळक घालतो आहे. हीच मी आपल्याला विनंती करतो.

**श्री.कैलास सोनवणे :-** जायच होत वरणगांवला आणि पोहचले धरणगांवला, ते अमरभाऊ पहिले पाईपांकडे घेऊन गेले मग भाऊ वाहन विभागाकडे घेऊन गेले.

**श्री.विष्णु भंगाळे :-** अप्पा साहेब वॉटरग्रेसबाबतच आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** साहेब, तुम्हाला जे काही कार्यवाही करायची आहे. ते तुम्ही लवकर करावी. एक निमंत्रण देतो आहे. मुकुंदभाऊ सोनवणे यांच्या मुलाचा नवसाचा कार्यक्रम आहे. मुलाच्या मानाचा कार्यक्रम आहे. नागझीरीला, तुम्हाला सर्वांना निमंत्रण देण्याची विनंती केलेली आहे. सगळेचे सगळे यावं. त्यानंतर आपले दोन बहिणी केव्हाचे बसलेल्या आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** ढेकळे साहेबांनी जो विषय मांडलेला आहे. आमच्या ईच्छादेवी पासुन ते डी.मार्ट पर्यंत डिव्हायडर टाकणेबाबत त्याच उत्तर प्रशासनाकडुन आलेल नाही अजुन.

**श्री.नितीन लढढा :-** ती चर्चा आप्पा ढेकळे साहेबांनी गेल्या दहा सभेपासुन ठेवलेली आहे. ढेकळे साहेबांसारखे जेष्ठ सदस्यांना जर योग्य प्रकारे सभागृहात उत्तर मिळत नसेल तर आम्हाला दुख वाटतं. कारण ते पुर्वीचे आमचे शिवसैनिक आहे.

**नगरसचिव :-** मी कु.राजश्री बाळासाहेब चव्हाण व कु.प्राजक्ता राजेश विंचवेकर यांना आंमत्रित करतो मा.महापौर महोदया त्यांच फुलगुच्छ देवुन त्यांचे अभिनंदन करतील.

**श्री.कैलास सोनवणे :-** वॉटरग्रेस च्या बाबतीत दंडवते साहेबांना काही सांगायचे आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** त्यांना सुचना करा महापौर ताई

**श्री.सदाशिव ढेकळे :-** सर्व सदस्यांनी शांतचित्तेने ऐका , साहेब खुलासा करत आहेत.माझ्या याच्यावर नाही दिला तरी चालेल आमची बाजु घेणारे भक्कम आहेत . नितीन भाऊ आहेत , विष्णु भाऊ आहेत माझ्या विषयाला चांगला पाठींबा द्यायला दोघे तिघे जण सक्षम आहेत .

**श्री.विशाल त्रिपाठी :-** भारतीय जनता पार्टी पण आहे तुमच्या सोबत .

**श्री.सदाशिव ढेकळे :-** प्रश्नच नाही.

**मा.उपायुक्त, श्री.दंडवते, आरोग्य विभाग:-** मा.आयुक्त , मा.महापौर साहेब, मा.सभागृह वॉटरग्रेस च्या संदर्भामध्ये भंगाळे साहेबांनी जो विषय मांडला की , वाहनांची तपासणी ऑलरेडी आम्ही वाहन विभागाला जी वाहने आपण वॉटरग्रेसला दिलेली आहेत त्यांची तपासणीचे आदेश दिलेले आहेत . येत्या ४ ते ५ दिवसांत त्याचा सर्व रिपोर्ट येईल म्हणजे ते वाहन खरेदी कधी केले , वाहनासोबत एसेसरीज काय होत्या त्याचे सर्विसिंग चे शेड्युल काय होतं त्या अनुषंगाने आणि त्याच्या इंन्श्युरन्स व काही पार्ट असतील जसे स्टेपनी असेल जे काही वस्तु चोरीला जातात आता जरे काही मुद्दा उपस्थित झालेला आहे .त्याबाबत वाहन विभागाकडुन पुढच्या चार पाच दिवसांमध्ये त्याचा रिपोर्ट येईल त्या रिपोर्ट च्या अनुषंगाने जी काही त्याची जबाबदारी असेंल ती त्यांच्यावर देवु आणि पण जर काही पोलीस कार्यवाही करावी लागली तरी आम्ही त्या अनुषंगाने ती करू. दंडाच्याबाबत मी मा.आयुक्त साहेबांकडे रिपोर्ट दिलेला आहे. ठेकेदाराला कोणत्याही प्रकारे पाठीशी घालण्याचा माझा आणि प्रशासनाचा कोणताही प्रयत्न नाही , मागच्या काही काळात पेपरला काही बातम्या आल्यात की प्रशासनाची बघ्याची भुमिका असते अश्या काही येत असतात . मी खुलासा आत्ता विनंती केली सभागृहाला म्हणुन मी सांगतो की वॉटरग्रेसचा कुठल्याही परिस्थिती मध्ये प्रशासन कुठेही पाठीशी घालत नाही . नियमाप्रमाणे अॅक्युलर प्रमाणे जो दंड त्याला आवश्यक होता ती आम्ही केलेली आहे , त्याला वेळोवेळी नोटीस दिलेल्या आहेत आणि जी अंतिम नोटीस त्याला दिलेली आहे त्या नोटीशीवर आपल्या विधी विभागाचा अभिप्राय घेवुन ती आम्ही आयुक्त साहेबांकडे आज किंवा उद्या फाईल करून देवु  निर्णय घेण्यासाठी आणि दुसरा एक विषय असा आहे की , तो जर उद्या कोर्टात गेला तर आपली बाजु तिथे भक्कम असावी त्या अनुषंगाने आम्ही त्याच रेकॉर्डही तयार केलेलं आहे जेणेकरून आपली बाजु सुध्दा कोर्टात सक्षम राहील आणि आपल्याला मागता येईल आणि कोर्टामध्ये सुध्दा आपला निश्चित विजय होईल या अनुषंगाने आम्ही सर्व रेकॉर्ड तयार केलेले आहे , दंडात्मक कार्यवाही तर वेळोवेळी सुरू आहे याबाबत नविन आयुक्त साहेबांनी काल त्यांची मिटींग पण घेतलेली आहे . त्याच्यावर परत दोन दिवसांत साहेबांनी चर्चाही ठेवलेली आहे आणि त्याचा जो काही फेल्युअर आहे तो आम्ही आयुक्त साहेबांसमोर ठेवलेला आहे .

**श्री.सदाशिव ढेकळे :-** साहेब मला माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही त्याबाबत विरोधी मला हसत आहेत तर तसे होते का ? मला ते उत्तर द्या  का थांबले आहे त्याला एक वर्ष झालंय त्याला मंजुरी देवुन .

**श्री.सुनिल भोळे , शहर अभियंता :-** सन्मा.महापौर ताई व सभागृह ते कामं डिव्हायडर टाकणे आणि पोल उभे करणे हे २५ कोटी निधी अंतर्गत प्रस्तावित आहे आणि काही भाग पुर्ण झालेला आहे आणि त्यात कोर्ट चौक ते गणेश कॉलनी आणि युनिटी चेंबरचा चा रस्ता आणि या निधी पण त्याचा भाग होता आणि मक्तेदाराने ते मान्य केलेले आहे व त्या निधी करीता ३० सप्टेंबर पर्यंत मुदत होती व ती संपलेली आहे त्याकरीता मक्तेदार जे आहेत थांबुन गेलेले आहेत. मी पुढची माहिती देतो की कालच महापौर ताईसोबत बैठक झालेली आहे याबाबत व त्यांना पुर्ण माहिती दिलेली आहे व आपण त्या सर्व कॉन्ट्रक्टर ला बोलावुन मग निर्णय घेणार आहेत .

**श्री.सदाशिव ढेकळे :-** एक वर्ष झाले मंजुरी देवुन आणि तुम्ही म्हणतात की एक केलं दुसरे बाकी आहे आणि त्याने हे कामं का दिलं त्याची जर कॅपेसिटी नव्हती तर त्याला हे कामं घेण्याची आवश्यकता नाही नंतरचे आधी करेल आणिहे नंतर करेल हे बरोबर नाहीये ना .

**श्री.कैलास सोनवणे :-** हया कामाचा ठेकेदार कोण होता ?

**श्री.सुनिल भोळे , शहर अभियंता :-** आपण एका ठेकेदाराला काम दिले नव्हते .

**श्री.मनोज चौधरी :-** आमच्या वॉर्डातही तिच परिस्थिती आहे आप्पा त्याला दोन चारदा फोन केला पण तो ऐकतच नाही .

**श्री.नितीन लढ्ढा :-** गणेश कॉलनी मधील कामाला प्राधान्य दिलं हे कामं प्राधान्याने का केलं नाही

**श्री.सुनिल भोळे , शहर अभियंता :-** कसे आहे भाऊ . .

**श्री.मनोज चौधरी :-**  तो ठेकेदार करत नाही मग त्या ठेकेदारावर कार्यवाही कोण करेल हे कोण सांगणार आहे यांना तो ठेकेदार अजुन कामं सुरू करत नाही .

**श्री.कैलास सोनवणे :-** मी कालचं त्यांच्याकडुन माहिती घेतली व मला यादी द्या ती यादी घेतली व नंबर पण घेतले आता त्यांना मी बोलवीन आणि कामं करायला लावु आपण त्यांना ठेकेदारावर कार्यवाही का नाही होत आहे याच्यावर आपल्या अवघड जागेचे दुखणं सांगतो ना

**श्री.मनोज चौधरी :-** ठेकेदाराच्या मागे पुढे कोणी असतील नगरसेवक म्हणा किंवा कोणीतरी ईतर वॉर्डाचे कामं होताहेत .

**श्री.कैलास सोनवणे :-** ठेकेदाराच्या मागे कोणीही असेल तरी कामं करायला लावीन तो कामं नको करू असे कसे म्हणेल

**श्री.मनोज चौधरी :-** आप्पा वर्ष होवुन गेले ना.

**श्री.कैलास सोनवणे :-** आपल्या अवघड जागेवरचे दुखणे वेगळे आहे.

**श्री.सुनिल भोळे , शहर अभियंता :-** आपण जर हे कामं रद्द केले तर त्याची फेर निविदा निघु शकत नाही .

**श्री.कैलास सोनवणे :-** हा प्रॉब्लेम आहे टेक्नीकल प्रॉब्लेम आहे जे असेल आम्ही बसु व त्यांना बोलावु , संगळयांना बोलावणार आहे येथे आणि जो निधी थांबुन गेला आहे ना त्याच्यामुळे पण हा प्रॉब्लेम आला आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** आप्पा पैसे आता थांबले आहे मग ऐवढे दिवस का झाले नाही .

**श्री.कैलास सोनवणे :-** त्याने जास्त कामं घेतलेले असतील त्याची कॅपेसिटी नसेल .

**श्री.मनोज चौधरी :-** आप्पा मग घ्यायचे नाही ना .

**श्री.कैलास सोनवणे :-** हो ना मग हाच विषय आहे , त्यांना काही कोणी पाठीशी घालणार नाही .

**मा.महापौर :-** नगरसचिव सभा संपलेली असल्याने राष्ट्रगित सुरु करावे.

**नगरसचिव :-** सन्मा.सभागृहाला विनंती आहे की सर्वांनी राष्ट्रगीतासाठी उभे राहायचं आहे.

राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**
**(भारती कैलास सोनवणे)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**